कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. २७ सप्टेंबर २०२४

किंमत ४ ₹

## खासदार संजय राऊतांना जामीन

**मुंबई :** भाजप नेते किरीट सोमय्या यांच्या पत्नी मेधा सोमय्या यांनी दाखल केलेल्या अब्रुनुकसानीच्या खटल्यात संजय राऊतांना न्यायालयाने अंशतः दिलासा दिला आहे. संजय राऊतांना १५ हजारांचा जामीन मंजूर करण्यात आला आहे. तसेच शिक्षेविरोधात सत्र न्यायालयात अपील करण्यासाठी निकालाला ३० दिवसांची स्थगिती देण्यात आली आहे. आपल्या आरोपानंतर मेधा सोमय्यांच्या मनाला वेदना होत असतील, तर त्यांचे पती इतरांवर बिनबुडाचे आरोप करताना इतरांना वेदना होत नसतील का, असा सवाल संजय राऊत यांनी विचारला.


YASHODA IVF
FERTILITY & IVF CENTRE
FREE FERTILITY CAMP
FREE
Consultation
Sonography
Semen Analysis
IVF Package 1.25 Lakhs* For First 100 couples
Book Your Free Consultation On
7575888333
OUR CENTRES: KAMOTHE | VASHI | ALIBAUG | MANGAON | CHARNI ROAD | THANE

# रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला राष्ट्रीय बहुमान

| रायगड | खास प्रतिनिधी |

केंद्रीय सहकार मंत्रालय आणि नाबार्ड यांच्या संयुक्त पुढाकाराने सुरू झालेली विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्था यांच्या संगणकीकरणाची मोहीम रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने पूर्ण केलेली आहे. त्याचे सादरीकरण ३० सप्टेंबर आणि १ ऑक्टोबरला बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक यांच्याद्वारे ओडिशा राज्यात भुवनेश्वर या ठिकाणी केले जाणार आहे. विशेष म्हणजे, देशपातळीवर हा उपक्रम पूर्ण करणारी रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही देशातील पहिली बँक ठरली आहे.




> बँकेचे चेअरमन जयंत पाटील यांच्यासह सर्व संचालकांनी केलेले मार्गदर्शन आणि घेतलेला पुढाकार तसेच बँकेच्या सर्व कर्मचाऱ्यांनी दिलेले योगदान, विशेष म्हणजे सर्व विविध कार्यकारी सहकारी संस्थाच्या संचालक आणि अध्यक्ष यांनी दाखविलेली मानसिकता यामुळे हा उपक्रम पूर्ण करण्यात बँकेला यश मिळाले आहे.
>
> – मंदार वर्तक, मुख्य कार्यकारी अधिकारी

### ओडिशा येथे सीईओ मंदार वर्तक करणार बँकेच्या प्रगतीचे सादरीकरण

या कार्यक्रमासाठी नाबार्डचे अध्यक्ष के.व्ही. शाजी, केंद्र सरकारच्या सहकार विभागाचे मुख्य सचिव आशिष कुमार भुतानी, महाराष्ट्र राज्याचे सहकार आयुक्त दीपक तावरे, नाबार्ड महाराष्ट्र विभाग कार्यालयाच्या प्रमुख रश्मी दराड, सर्व राज्यांचे सहकार सचिव, आयुक्त, नाबार्डचे वरिष्ठ अधिकारी आणि देशापातळीवरील सहकार विषयाचे प्रमुख अभ्यासक यावेळी उपस्थित राहणार आहेत. •> पान ८ वर

### आरडीसीसीने प्रकल्प वेळेच्या आधीच केला पूर्ण

संपूर्ण भारतामधील ६२ हजार ३१८ विविध कार्यकारी सहकारी संस्थांना अधिक सक्षम आणि व्यवसायाभिमुख बनविण्याच्या दृष्टीकोनातून या सर्व विविध कार्यकारी सहकारी संस्थांचे संगणकीकरण करण्याचा अभिनव प्रकल्प केंद्रीय सहकार मंत्रालय यांच्यावतीने सुरू करण्यात आला आहे. यामध्ये भारतातील २८ राज्ये आणि सर्व केंद्रशासित प्रदेश समाविष्ट आहेत. रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने हा प्रकल्प वेळेच्या आधीच पूर्ण करून संगणकीकरणामध्ये अव्वल स्थान प्राप्त केले आहे.

रायगड जिल्हा बँकेने केलेले काम हे उल्लेखनीय असून, राज्यातील इतर सहकारी बँकांनीदेखील त्याची प्रेरणा घेऊन काम करावे. बँकेच्या या कामगिरीबद्दल नाबार्ड महाराष्ट्राच्या प्रमुख सीजीएम रश्मी दराड, राज्याचे सहकार आयुक्त दीपक तावरे, सहकार क्षेत्रातील विविध मान्यवरांनी बँकेचे कौतुक केले आहे.

## आरसीएफ शाळेतील शिक्षक, कर्मचाऱ्यांचा
# पाच कोटींचा पगार थकला

### ४४ जणांना जून ते सप्टेंबर या महिन्याचे वेतन मिळाले नसल्याची माहिती

**प्रमोद जाधव**

| अलिबाग |

अलिबाग तालुक्यातील कुरुळ येथील आरसीएफ संचलित शाळेतील ४४ शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी गेल्या चार महिन्यांपासून वेतनाविना काम करीत आहेत. त्यांच्यावर मोठे आर्थिक संकट निर्माण झाले आहे. सुमारे पाच कोटींहून अधिक रुपयांचे वेतन थकले असल्याची माहिती समोर आली आहे.

आरसीएफ शाळा गेल्या अनेक महिन्यांपासून वादाच्या भोवऱ्यात सापडत आहे. शाळा बंद ठेवण्याच्या भूमिकेबाबत पालकवर्गात संतापाची लाट उसळत असताना गेल्या चार महिन्यांपासून आरसीएफ शाळेतील शिक्षकांना वेतनच मिळाले नसल्याची बाब समोर उघड झाली आहे. थळ येथील खतनिर्मिती करणाऱ्या आरसीएफ प्रकल्पाच्या स्थापनेनंतर कुरुळ येथे आरसीएफ संचलित डेक्कन एज्युकेशन सोसायटीमार्फत शाळा सुरु करण्यात आली. या शाळेत सुरुवातीला आरसीएफ कर्मचाऱ्यांची •> पान ८ वर

> आरसीएफ व डेक्कन शिक्षण संस्थेमध्ये करार झाला होता. या संस्थेच्या खात्यामध्ये वेतन व इतर निधी वर्ग केला जात होता. मात्र, डेक्कन शिक्षण संस्था शाळा चालविण्यास तयार नसल्याने आता निधी कोणाच्या खात्यात जमा करायचा, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. त्यामुळे वेतन थकले आहे. यावर तोडगा निघाल्यास तातडीने वेतन वर्ग केले जाईल.
>
> – आरसीएफ प्रशासन तथा जनसंपर्क कार्यालय

शाळेत सीनिअर केजीपासून चौथीपर्यंत ३२१ विद्यार्थी व पाचवीपासून बारावीपर्यंतचे ५९६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शाळेमध्ये प्राथमिक विभागाच्या शिक्षकांसह १३ कर्मचारी आहेत. त्यात तीन कंत्राटी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आहेत. तसेच माध्यमिक विभागाच्या शिक्षकांसह ३६ कर्मचाऱ्यांचा समावेश असून, कंत्राटी १२ शिक्षक आहेत. यातील प्राथमिक, माध्यमिक विभागातील नियमित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी असे एकूण ४४ जणांना जून ते सप्टेंबर या चार महिन्यांचे वेतन मिळाले नसल्याची माहिती समोर आली आहे.





(छायाचित्र : समीर मालोदे)

## समायोजनास पालकांचा विरोध

### आरसीएफ प्रशासन, शिक्षण विभागाची बैठक

| अलिबाग | प्रतिनिधी |

सुरु असलेली आरसीएफची शाळा बंद करुन विद्यार्थ्यांचे अन्य शाळेत समायोजन करण्याच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. त्यामुळे पालकांनी आक्रमक भूमिका घेत शिक्षण विभागासह आरसीएफ प्रशासनाविरोधात गुरुवारी संताप व्यक्त केला. शाळेचा दर्जा चांगला असताना शाळा बंद करण्याची भूमिका का घेतली जात आहे, असा सवाल उपस्थित करण्यात आला.

डेक्कन एज्युकेशन सोसायटीमार्फत आरसीएफची शाळा चालविली जात होती. परंतु, शाळा चालविण्यास समर्थ नसल्याचे शिक्षण संस्थेने कळविले. त्यामुळे शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची भीती पालकांमध्ये निर्माण झाली होती. अखेर पालकांनी •> पान ८ वर

## हक्कासाठी उमेदच्या महिला एकवटल्या

### विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन



(छायाचित्र : समीर मालोदे)

| अलिबाग | प्रतिनिधी |

महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी काम करणाऱ्या उमेदच्या महिला गुरुवारी त्यांच्या न्याय्य हक्कासाठी एकवटल्या. त्यामध्ये पुरुषांनीदेखील सहभाग घेतला. अलिबागमधील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर गुरुवारी त्यांनी आंदोलन करून आमच्या मागण्या पूर्ण करा, अशा घोषणा देत मागणी केली.

यावेळी शिरीष पाटील, सिध्देश राऊळ, चंद्रशेखर पाटील, हर्षल परब, प्रीती पाटील, चित्रांगी म्हात्रे, मिलिंद बाचल, रामेश्वर मदने, अजिनाथ फुंदे, रक्षा वाघे, वेदिका कडव, करुणा भोईर, काजल पाटील यांच्यासह एक हजारहून महिला, पुरुष आंदोलनात सहभागी झाले होते.

महाराष्ट्र सरकारकडून राबवण्यात येणारे उमेद अभियान हे महिला स्वयं सहायता समूह (बचत गट) •> पान ८ वर

## पालीमध्ये घरात शिरले पाणी

| पाली/गोमाशी | वार्ताहर |

अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीमध्ये बुधवारी (ता.२५) सायंकाळी तुफान पाऊस पडला. या पावसामुळे येथील खडकआळी व प्रबुद्ध नगरजवळील घरांमध्ये पाणी शिरले. पालीत पडलेल्या या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले होते.

ढगफुटीसारख्या पावसामुळे येथील नाले प्रचंड भरले आणि नाल्यातून बाहेर रस्त्यावर पाणी वाहू लागले. येथील •> पान ८ वर

## आज सहाण बायपासला महिलांचा मेळावा

| अलिबाग | प्रतिनिधी |



शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने सहाण बायपास येथील श्री समर्थ हॉलमध्ये महिलांचा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. रायगड जिल्हा महिला बचत गट फेडरेशन पुरस्कृत 'लेक शिवबा'ची हा भव्य संवाद मेळावा शुक्रवारी (दि. २७) सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांच्या उपस्थित होणार आहे.

रेवदंडा, चौल, नागाव, आक्षी, बेली, बेलकडे, ढवर, सहाण, बामणगाव, कावीर, खानाव या ग्रा.पं.मधील महिलांसाठी हा मेळावा होणार आहे. यावेळी शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख अ‍ॅड. मानसी म्हात्रे आदी मान्यवरांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

## राजकीय बनाव, महायुतीत तणाव

| कर्जत | वार्ताहर |

- **आमदार थोरवेंना राष्ट्रवादीचे आव्हान; भाजपही इच्छुक**
- **कर्जत खालापूर मतदारसंघाचा पेच वाढणार**

सध्या राजकारणामध्ये पक्ष निष्ठा, वैचारीक बैठक यांना महत्त्व राहिलेले नाही. सकाळी एका पक्षात, तर रात्री अन्य पक्षात राजकीय नेते जात असल्याने राजकारणात बेबनाव दिसत आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे यांनी शिवसेना शिंदे गटाचे विद्यमान आमदार महेंद्र थोरवे यांच्याविरोधात शड्डू ठोकला आहे. राष्ट्रवादीच्या वरिष्ठांनी घारे यांना पाठबळ देत थोरवेंसमोर आव्हान उभे केल्याने कर्जत खालापूर विधानसभा मतदारसंघाच्या जागेवरुन महायुतीत तणाव वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

कर्जत खालापूर विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व सध्या शिवसेना शिंदे गटाचे आमदार महेंद्र थोरवे करत आहेत. त्यामुळे जागावाटपात ही जागा शिंदे गटाला सुटणार, असा थोरवे यांचा दावा आहे. मात्र, दुसरीकडे सुधाकर घारे यांनीदेखील विधानसभा निवडणुकीची तयारी सुरु केली आहे. कर्जत खालापुरात सुधाकर घारे आणि महेंद्र थोरवे यांच्यात सध्या राजकीय वाक्‌युद्ध रंगले आहे. दोघांनीही महायुतीचे तिकीट आपल्यालाच मिळणार, असा दावा करत निवडणुकीची जोरदार तयारी सुरु केली आहे.

> दुसरीकडे थोरवे यांना राष्ट्रवादीसह भाजपच्या स्थानिक नेत्यांचादेखील विरोध आहे. थोरवे उमेदवार नकोत, अशा तक्रारीदेखील ते त्यांच्या वरिष्ठांकडे करत असल्याची चर्चा आहे. थोरवे यांचा गेल्या पाच वर्षांतला एककल्ली कारभार, मतदारसंघात रखडलेला विकास, वाढती गुंडगिरी आणि गुन्हेगारी, अशामुळे थोरवे यांच्या लोकप्रियतेला धक्का बसत असल्याचे दिसून येते.

महायुतीचे जागावाटप अद्याप निश्चित झालेले नाही. भाजपची देखील या मतदारसंघात चाचपणी सुरु आहे. भाजपचे कर्जत खालापूर विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष किरण ठाकरे हे •> पान ८ वर

## विक्रेत्याने मुलींची छेड काढली

| नेरळ | वार्ताहर |

कर्जत शहरातील श्रीराम पुलाच्या परिसरात कर्जत नगरपरिषदेच्या जागेत अनधिकृतपणे टपरी लावण्यात आली आहे. ती अनधिकृत टपरी चालविणाऱ्या चालकाने शालेय मुलींची छेड काढली. त्यामुळे संतप्त झालेल्या नागरिकांनी त्या टपरी चालकाला चोप दिला. पालिकेने अद्याप अनधिकृत टपरी जप्त करण्याची कार्यवाही केली नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

कर्जत श्रीराम पुलावर असलेल्या अनधिकृत टपरीधारकाकडून बेकायदेशीर गुटख्यासह तंबाखू, विडी, सिगारेट यांची विक्री होत असून, सदर विक्रेता गांजासारखा अंमली पदार्थही विक्री करत •> पान ८ वर

### नाक्या-नाक्यांवर होणार काटेकोर तपासणी

# मतदारांना प्रलोभने दाखविणाऱ्यांनो सावधान

| रायगड | खास प्रतिनिधी |

काहीच दिवसांनी विधानसभेच्या निवडणुकीचे बिगुल वाजणार आहे. निवडणुकीच्या कालावधीत मतदारांना विविध राजकीय पक्षांच्या उमेदवारांकडून प्रलोभने दाखवण्यात येतात. त्यामुळे आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होते. यातून मार्ग काढण्यासाठी जिल्हा प्रशासनाने आता आंतरजिल्हा सीमा भागातील तपासणी नाक्यावर काटेकोर तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, चोख तपासणी करुनही मतदारसंघामध्ये पैशाचे, दारुचे वाटप केले जाते, तसेच विविध पार्ट्यांदेखील झोडल्या जातात, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही.




आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सीमेलगतच्या जिल्हा क्षेत्रात आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने रायगड, पुणे, सातारा, रत्नागिरी, सोलापूर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांची दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला जिल्हाधिकारी रायगड किशन जावळे, पुणे जिल्हाधिकारी सुहास दिवसे, सातारा जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, सोलापूर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, रायगड पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, पुणे पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, सातारा पोलीस अधीक्षक •> पान ८ वर

|| पुण्यस्मरण ||



स्व. दामोदर अनंत म्हात्रे
(दामु गुरुजी)
मृत्यू दि. २७-०९-२०२३
प्रथम पुण्यस्मरण
शुक्रवार दि. २७ सप्टेंबर २०२४ रोजी
शोकाकुल
समस्त म्हात्रे परिवार आणि आप्तेष्ट

# लोहार समाजाची सभा संपन्न

**उरण :** हिंदू लोहार समाज महासंघ, मुंबई, महाराष्ट्र यांच्यावतीने मंगळवारी हनुमान मंदिरात नवनिर्वाचित उरण तालुका कार्यकारी मंडळ नियुक्त करण्यात आले. उरण तालुका लोहार समाजाच्या अध्यक्षपदी कृष्णा व्यापारी यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्ष अनंता जोशी, उपाध्यक्ष, अमोल कोशे, कार्याध्यक्ष संतोष जाधव, सचिव दिनेश पवार, खजिनदार दिपक खंडागळे, महिला सदस्य सोनाली जाधव, निकिता मने, विधी सल्लागार पुर्वी कोशे यांची निवड करण्यात आली.

## SRM E-TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** Specification.

| | |
|---|---|
| Tender No. : E-Tender -07/ 2024-25<br>**Name of Tender :** E-Tender for the work of trimming of tree branches & disposing off the same outside the premises at Major Stores, Panvel for FY 2024-25.<br>**Tender Fee :- Rs. 500 /- + applicable GST**<br>**RFx No.- 7000033610** | **Online Downloading the RFx :** Dt.27.09.2024, 00:00 Hrs. to 03.10.2024, 23:59 Hrs.<br>**Online Submission of the RFx :** On or Before Dt. 03.10.2024, 23:59 Hrs.<br>**Online Opening of the Techno Commercial RFx :** Dt. 04.10.2024, at 10:00 Hrs. (If possible ).<br>**Online Opening of the Price bid:** Dt. 04.10.2024 at 12:00 Hrs. (If possible) |

For further details visit our website :- https://srmetender.mahatransco.in
Contact Person : - The Executive Engineer, Mobile No. 8275215120
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**Executive Engineer, Major Stores, Panvel**

## खोपोली नगरपरिषद

KMC

**खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड, पिनकोड नं ४१० २०३.**
**फोन नं. (०२१९२) २६२२२२ २६३३५६, २६४२११**

जा.क्र.केएमसी/पाप/१३७४ दिनांक :- २६/०९/२०२४

**पाणीपुरवठा विभाग**
**निविदा सुचना क्र.०३**

वाचा:- मा. मुख्याधिकारी खोपोली नगरपरिषद यांचे कडील आधिकार प्रत्यायोजित आदेश खो.न.प जा.क्र. केएमसी/ जीईए/ईएसटी/४५६ खो. न. प कार्यालय दि. १९/०७/२०२४

खोपोली नगरपरिषद, खोपोली जि. रायगड यांजकडुन खालील कामांसाठी राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागात योग्य त्या वर्गात नोंदविलेल्या अनुभवी व इच्छुक ठेकेदारांकडुन ब-१ नमुन्यातील व्दिनोंद लिफाफा पध्दतीने सिलबंद मागविणें येत आहेत.

| अ. क्र | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम रु. | अनामत रक्कम रु. | काम करण्याचा कालावधी | निविदा फॉर्म विक्री किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १. | खोपोली नगरपरिषद हद्दीतील पटेलनगर येथील पाण्याची टाकी (ई.एस.आर) दुरुस्ती करणे बाबत. | ३९०७५५/- | ४०००/- | ३० दिवस | ५००/- |

**कामाच्या अटी व शर्ती**

निविदा फॉर्मची विक्री कार्यालयीन वेळेत दि. २७/०९/२०२४ ते ०४/१०/२०२४ पर्यंत सकाळी १०.३० ते सायं ५.३० वा. पर्यंत राहील. मात्र या करिता निविदा फॉर्म फी नागरी सुविधा केंद्रात जमा केल्यानंतर पाणीपुरवठा विभागातुन फॉर्म उपलब्ध करुन मिळेल.

सविस्तर कामासंबंधी अतिरिक्त माहिती खोपोली नगरपरिषद पाणीपुरवठा विभागात कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस खेरीज) मिळू शकेल.

सही /-
**प्र.पा.पु अभियंता**
**खोपोली नगरपरिषद**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे टेकाळी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या बिनशेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री. भूषण भिकाजी निकम व सौ.उज्वला भूषण निकम, दोघे रा. फ्लॅट नं. २०१, रुणवाल ग्रँट को.ऑप.हौ. सोसा., १८ वा रस्ता, गांधी मंडई जवळ, चेंबूर-पूर्व, मुंबई ४०० ०७१ यांच्या खुद्द मालकीची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेली मिळकत आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | पोट नं. | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| टेकाळी ता. अलिबाग | ४२२ | - | २१-००-०० | २१०.०० |

वर नमूद मिळकतीपैकी १२-००-०० आर.चौ.मी., आकार रु.१२०.०० या मिळकतीबाबत.

तरी सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा कब्जा, भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे गृहीत धरुन माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २७/०९/२०२४ सही/ -
**ॲड. विवेक रमेश साळवी**
शॉप नं. ५, दुय्यम निबंधक कार्यालयासमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर सूचना

हे सर्वसामान्य जनतेच्या माहितीसाठी कळविण्यात येत आहे की, माझे अशील सौ. प्रीती बकुल पारेख आणि कु. उर्वी बकुल पारेख या मे. एनयु डेवेलोपेर्स अँड इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लिमिटेडच्या संचालक असून, त्या "कावेरी को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी 'A' बिल्डिंग", क्षेत्रफळ 840 चौ. मी.,सर्व्हे क्र. 120/1/ए/1/2/3, मौजे चेंद्रे, शासकीय वसाहतीच्या मागे, चेंद्रे ग्रामपंचायत, तालुका अलीबाग, जिल्हा रायगड, महाराष्ट्र, पिन - 402201 या ठिकाणच्या मालमत्तेच्या कायदेशीर विकसक आहेत, ज्यासाठी 10/10/2021 रोजी सामंजस्य करार आणि 12/08/2023 रोजी विकास करार करण्यात आले आहे. तसेच, " कावेरी को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी ' B आणि C ' बिल्डिंग", क्षेत्रफळ 687 चौ. मी., सर्व्हे क्र. 120/1/ए/4/5, शासकीय वसाहतीच्या मागे, चेंद्रे ग्रामपंचायत, तालुका अलीबाग, जिल्हा रायगड, महाराष्ट्र, पिन - 402201 या ठिकाणच्या मालमत्तेसाठी 11/12/2021 रोजी सामंजस्य करार आणि 11/03/2023 रोजी विकास करार करण्यात आला आहे.

हे जाहीर करण्यात येत आहे की, माझ्या अशिलाशिवाय इतर कोणत्याही व्यक्ती, संस्था किंवा विकसक यांना सदर मालमत्तेच्या पुनर्विकास प्रकल्पात कोणतेही अधिकार, दावा किंवा हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही. या मालमत्तेसंदर्भात तृतीय पक्षांसोबत कोणतेही व्यवहार बेकायदेशीर ठरतील आणि अशा कोणत्याही अनधिकृत व्यक्तींविरुद्ध योग्य कायदेशीर कारवाई केली जाईल. अनधिकृत कृत्ये झाल्यास संबंधित पक्षांना सर्व खर्च स्वतःच करावे लागतील.

ही सूचना सर्वसामान्य जनतेसाठी काढण्यात आलेली असून, कोणत्याही गैरसमज किंवा अनधिकृत व्यवहार टाळण्यासाठी आहे. अधिक माहितीसाठी किंवा स्पष्टीकरणासाठी कृपया खालील संपर्क साधावा.

**ॲड. रवीन पालेकर**
पत्ता: B-09, सूर्यकिरण अपार्टमेंट, अवधूत नगर, दहिसर (पूर्व), मुंबई - 400 068 ई-मेल: raveenpalekar@gmail.com
मो.: 9892059736

## अलिबाग नगरपरिषद
## अलिबाग - रायगड
## जाहिर निविदा सूचना क्र.

अलिबाग नगरपरिषदेच्या हद्दीतील खालील काम करण्यासाठी सिलबंद निविदा मान्यताप्राप्त व सक्षम पात्रता असलेल्या पालिकेच्या विषयीच्या अटी व शर्तीची पूर्तता करीत असलेल्या कंत्राटदाराकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | कोऱ्या निविदा पत्रकाची किंमत | काम पूर्ण करण्याची मुदत | ठेकेदाराची पात्रता |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | अलिबाग नगरपरिषद हद्दीतील मुस्लीम कब्रस्थान सुशोभिकरण करणे. | ४,९९,१२९/- | ४,९९१ /- | ५००/- | ३० दिवस | सार्वजनिक बांधकाम विभागाचे सक्षम नोंदणीकृत असलेला |

कोऱ्या निविदा नगरपरिषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत दिनांक २७/०९/२०२४ पासून दिनांक ३/१०/२०२४ पर्यंत सायं. ५-०० वाजेपर्यंत सुट्टीचे दिवस वगळता देण्यांत येतील. प्रत्येक कामाच्या सिलबंद निविदेसोबत रोख स्वरुपात इसारा रक्कम भरल्याची मूळ पावती बंद लिफाफ्यात भरुन जोडणेची असून प्रत्येक कामाची सिलबंद निविदा दिनांक ४/१०/२०२४ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत नगरपरिषद कार्यालयात सुट्टीचे दिवस वगळता सादर करणेची आहेत. या वेळेनंतर आलेल्या तसेच अपऱ्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत. निविदा मुख्याधिकारी शक्य असल्यास त्यांचे दालनात निविदाधारक उपस्थित असलेस त्यांचे समोर दिनांक ७/१०/२०२४ रोजी सायं. ४-०० वाजता उघडतील. अपुऱ्या अगर चुकीच्या माहिती भरलेल्या निविदा तसेच निविदेमध्ये खाडाखोड केलेल्या निविदा विचाऱ्यात घेतल्या जाणार नाहीत. तसेच नगरपरिषद कार्यालयात कोरे निविदा फॉर्म मिळतील. कोणतेही एक किंवा सर्व निविदा पत्रके कारण न दाखविता नाकारण्याचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.

निविदेबाबत सविस्तर माहिती नगरपरिषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत बांधकाम विभागात मिळेल.

सही/-
**मुख्याधिकारी**
**अलिबाग नगरपरिषद,**

## E –TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No :-7000033586**<br>**Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/ e-Tender-34/ 2024-2025.** RFx E-tender for work of strength evaluation survey (Structural Stability) of existing foundation & tower members of 220kV Apta – Taloja – Kalwa D/C line & 220kV ONGC – KGaon-Topworth-Khandeshwar D/C line under EHV Lines Maint Sdn Panvel under EHV (O&M) Division Panvel.<br>**Tender amount Rs. 20,35,264/-,**<br>**EMD amount Rs. 20,353/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **26.09.2024, 18:00 Hrs. to 03.10.2024, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 03.10.2024 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **04.10.2024 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- https://srmetender.mahatransco.in
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL**

**जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र.२४७/ म.प्र -१, दि.१८/१०/२०२३**
**परिशिष्ट-३**
**(ई-निविदेसाठी जाहिरात नमुना)**

## महाराष्ट्र शासन
## कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,

**रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि.रायगड**
**ई-मेल :-eerid२४@gmail.com. दुरध्वनी क्र.०२१४०/२५०८५७**
**ई-निविदा सूचना क्र. २७ सन २०२४-२५**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीन कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि.रायगड पिन नं.४०२३०४ हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेस्थळ : https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर ई-निविदा सूचना व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि.रायगड पिन नं.४०२३०४ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदेची किंमत रु.(G.S.T. & royalty धरुन) | इसारा रक्कम रु. | काम पुर्ण करणेचा कालावधी | ई-निविदा संचाची किंमत रु. | कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | खैरे लघु पाटबंधारे योजना, ता. महाड, जि.रायगड महाड शाखेंतर्गत खैरे लघु पाटबंधारे योजनेची सांडवा बार बांधणे व सांडव्याच्या दोन्ही बाजूस संरक्षण भिंत बांधणे तसेच धरण माथ्यावर भराव करणे तसेच एच.आर.वेल मधील आर.सी.सी. पाईप कंड्युट च्या गाळाचे निष्कासन करणे, नवीन मेष्ज्ञ टाकने तसेच धरणावर गेजपट्टी लावणे व इतर अनुषंगिक कामे करणे. | ७०,००,०००/- | ७००००/- | १२ महिने | रु.२०००/- + रु.३६०/- रु.२३६०/- जी.एस.टी. सहित (ना-परतावा) | वर्ग-४अ व त्यावरील |
| २. | कोंडगांव लघु पाटबंधारे योजना, ता.सुधागड, जि. रायगड कोंडगांव लघु पाटबंधारे योजनेच्या सांडवा लागतच्या भिंतीची दुरुस्ती करणे व इतर अनुषंगिक कामे करणे. | ३०,००,०००/- | १५०००/- | १२ महिने | रु.२०००/- + रु.३६०/- रु.२३६०/- जी.एस.टी. सहित (ना-परतावा) | सुशिक्षित बेरोजगार अभियंता (रायगड जिल्हा) |

**निविदा उपलब्ध कालावधी दि.२६/०९/२०२४ ते दि.०३/१०/२०२४**
**ई-निविदा उघडण्याचा दि. ०७/१०/२०२४**

खालील संकेतांक स्थळावर ई-निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. संकेतस्थळ : https://mahatenders.gov.in.
२. कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि.रायगड या कार्यालयातील सूचना फलक.
३. जलसंपदा विभागाचा दि. १८/१०/२०२३ रोजीच्या सुधारीत शासन निर्णयान्वये कार्यवाही करणेत यावी.
४. पत्रव्यवहारासाठी संपर्क व्यक्ती व पत्ता:- कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता.रोहा, जि.रायगड पिन नं.४०२३०४ ई-मेल eerid२४@gmail.com.
५. निविदा सादर करण्यासाठी निविदाकार यांनी केलेल्या आर्थिक खर्चास जबाबदार न राहता कोणतीही एक किंवा सर्व निविदा फेटाळण्याचा किंवा संपुर्ण निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकाऱ्याने राखुन ठेवलेले आहेत.
६. निविदा प्रक्रियेमध्ये पश्चात अर्हता निकष ठेवण्यात आलेले आहेत.
७. ई-निविदा प्रक्रियेसाठी कोणत्याही परिस्थितीत निविदाकाराकडून निविदा छापील प्रतिच्या (Hard Copy) स्वरुपात स्वीकारली जाणार नाही.
टिप:- निविदा भरतांना आपले दर G.S.T. वगळून भरणे बंधनकारक आहे. G.S.T. चे दर संबंधीत विभागाचे नियमाप्रमाणे लागू राहतील.

सही/-
**(इंजि.मिलींद पवार)**
**कार्यकारी अभियंता,**
**रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड.**

**विमाका/कोवि/२०२४-२०२५/९७**

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

(तहसिलदार कार्यालय, मुरुड जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड, जि. रायगड)

ज.म.र अर्ज १७३/२०२४

**जाहिर नोटीस**

शाहीदा बशिर महाडकर,
रा. मु. खालचा मोहोल्ला रोहा, अर्जदार
ता. रोहा, जि. रायगड.
विरुद्ध
ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत बोर्ली सामनेवाला
ता. मुरुड, जि. रायगड.

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस काळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार शाहिदा बेगम हुसैनमिया दळवी, हिचा जन्म दिनांक ०४/०८/१९६०, रोजी माहेरच्या घरी म्हणजे मौजे बोर्ली, ता. मुरुड जंजिरा, जि. रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत बोर्ली कार्यालय यांचे जन्म मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वेय अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार शाहिदा बेगम हुसैनमिया दळवी, हिचा दिनांक ०४/०८/१९६० रोजी जन्म झाल्याबाबत कोणचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलांमार्फत मे न्यायालयांत दि.२९/१०/२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीत असल्यास कोणचीही कोणतीही हरकत नाही, असे समजुन अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज २४/०९/२०२४ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

कळावे.

सही/-
**(रोहन शिंदे)**
**तहसिलदार मुरूड-जंजिरा,**

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

**(तहसिलदार कार्यालय, मुरुड जंजिरा, दरबार रोड, ता. गुरूड, जि. रायगड )**

ज.म.र अर्ज १७२/२०२४

**जाहिर नोटीस**

नसरीन बेगन मेहमूद चोगले
रा. मु. मस्जिद जवळ विहूर, अर्जदार
ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड,
विरुद्ध
ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत विहूर, सामनेवाला
ता. मुरुड, जि. रायगड.

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस काळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार नसरीन बेगन मेहमूद चोगले, हिचा जन्म दिनांक ०४/०८/१९७१ रोजी अर्जदार हिच्या घरी म्हणजे मौजे विहूर, ता. मुरुड जंजिरा, जि. रायगड येथे झाला असून तिच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत विहूर कार्यालय यांचे जन्म मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३(३) अन्वेय अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार नसरीन बेगन मेहमूद चोगले हिचा दिनांक ०४/०८/१९७१ रोजी जन्म झाल्याबाबत कोणचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलांमार्फत मे. न्यायालयांत दि. २९/१०/२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीत असल्यास कोणचीही कोणतीही हरकत नाही. असे समजुन अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता.२४/०९/२०२४ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

कळावे.

सही/-
**(रोहन शिंदे )**
**तहसिलदार मुरूड-जंजिरा**

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

(तहसिलदार कार्यालय, मुरुड जंजिरा, दरबार रोड, ता. मुरूड, जि. रायगड )

ज.म.र अर्ज /२०२४

**जाहिर नोटीस**

दिलरुबा महमद चोगले,
रा. मु. वडवली, ता श्रीवर्धन, अर्जदार
जि. रायगड.
विरुद्ध
ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत विहूर सामनेवाला
ता. मुरुड, जि. रायगड.

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस काळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार दिलरुबा महमद चोगले,, हिचा जन्म दिनांक १३/०६/१९६४, रोजी माहेरच्या घरी म्हणजे मौजे विहूर, ता. मुरुड जंजिरा, जि. रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत विहूर कार्यालय यांचे जन्म मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वेय अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार दिलरुबा महमद चोगले, हिचा दिनांक १३/०६/१९६४ रोजी जन्म झाल्याबाबत कोणचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलांमार्फत मे न्यायालयांत दि. २९/१०/२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीत असल्यास कोणचीही कोणतीही हरकत नाही. असे समजुन अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता २४/०९/२०२४ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

कळावे.

सही/-
**(रोहन शिंदे)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल, श्री. गजानन काशिनाथ ठोंबरे, यांनी जमीन मालक डॉ. ओंकार आमिर पावस्कर यांचेकडून त्यांचे ताबेकब्जा वहिवाटीतील, व मालकीची, आणि भोगवटासदरी नावे असलेली खालील वर्णनाची जमीन मिळकत, कायमची विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे सावळे, ता. कर्जत, जि. रायगड, येथील मिळकत**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ७२/१/अ | ०.५२.३०<br>पो.ख. ०.४६.५०<br>एकूण : ०.९८.८० | २.४४ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत, इतर दुसरे कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून, १४ (चौदा) दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकत विकत घेण्याचा व्यवहार, म्हणजेच खरेदीखत करून पूर्ण करतील. तसेच मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कळावे
**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस : श्री साई सावली, सो.लि. दसरा मजला, ब्लॉक नं. १०.
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता. कर्जत, जि. रायगड, पिन ४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८
कर्जत दि. २७/०९/२०२४

**जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र.२४७/ म.प्र -१, दि.१८/१०/२०२३**
**परिशिष्ट-३**
**(ई-निविदेसाठी जाहिरात नमुना)**

## महाराष्ट्र शासन
## कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,

**रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि.रायगड**
**ई-मेल :-eerid२४@gmail.com. दुरध्वनी क्र.०२१४०/२५०८५७**
**ई-निविदा सूचना क्र. २९ सन २०२४-२५**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीन कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि.रायगड पिन नं.४०२३०४ हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेस्थळ : https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर ई-निविदा सूचना व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता.रोहा, जि.रायगड पिन नं.४०२३०४ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदेची किंमत रु.(G.S.T. & royalty धरुन) | इसारा रक्कम रु. | काम पुर्ण करणेचा कालावधी | ई-निविदा संचाची किंमत रु. | कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | बामणोली लघु पाटबंधारे योजना, ता.पनवेल, जि.रायगड मुख्य विमोचकाजवळ गळती प्रतिबंधक उपायोजना करणे तसेच धरणाच्या पक्षभिंतीची दुरुस्ती करणे व इतर अनुषंगिक कामे करणे | ७५,००,०००/- | ७००००/- | १२ महिने | रु.२०००/- + रु.३६०/- रु.२३६०/- जी.एस.टी.सहित (ना-परतावा) | वर्ग-४अ व त्यावरील |

**निविदा उपलब्ध कालावधी दि.२६/०९/२०२४ ते दि.०३/१०/२०२४**
**ई-निविदा उघडण्याचा दि. ०७/१०/२०२४**

खालील संकेतांक स्थळावर ई-निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. संकेतस्थळ : https://mahatenders.gov.in.
२. कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि.रायगड या कार्यालयातील सूचना फलक.
३. जलसंपदा विभागाचा दि. १८/१०/२०२३ रोजीच्या सुधारीत शासन निर्णयान्वये कार्यवाही करणेत यावी.
४. पत्रव्यवहारासाठी संपर्क व्यक्ती व पत्ता:- कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि.रायगड पिन नं.४०२३०४ ई-मेल eerid२४@gmail.com.
५. निविदा सादर करण्यासाठी निविदाकार यांनी केलेल्या आर्थिक खर्चास जबाबदार न राहता कोणतीही एक किंवा सर्व निविदा फेटाळण्याचा किंवा संपुर्ण निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकाऱ्याने राखुन ठेवलेले आहेत.
६. निविदा प्रक्रियेमध्ये पश्चात अर्हता निकष ठेवण्यात आलेले आहेत.
७. ई-निविदा प्रक्रियेसाठी कोणत्याही परिस्थितीत निविदाकाराकडून निविदा छापील प्रतिच्या (Hard Copy) स्वरुपात स्वीकारली जाणार नाही.
टिप:- निविदा भरतांना आपले दर G.S.T. वगळून भरणे बंधनकारक आहे. G.S.T. चे दर संबंधीत विभागाचे नियमाप्रमाणे लागू राहतील.

सही/-
**(इंजि.मिलींद पवार)**
**कार्यकारी अभियंता,**
**रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड.**

**विमाका/कोवि/२०२४-२०२५/९९**

## आधुनिक हेअर कटींग मार्गदर्शन शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

# नाभिक समाजाला कायम सहकार्य राहील

### ■ चित्रलेखा पाटील यांचे आश्वासन

। अलिबाग । प्रतिनिधी ।

शेतकरी कामगार पक्ष नेहमी कष्टकरी, कामगार, शेतकरी वर्गाच्या पाठीशी कायमच राहिला आहे. गोरगरींबांच्या न्याय हक्कासाठी लढणारा शेकाप हा एकमेव पक्ष आहे. हेअर कटींग मार्गदर्शन शिबीर व सेमिनार सारखे कार्यक्रम मुंबई, पुणे सारख्या मोठ्या शहरांमध्ये घेतले जातात. त्याच धर्तीवर अलिबागमध्ये हा उपक्रम राबविल्याचा आनंद होत आहे. अलिबागमधूनदेखील चांगले कलाकार, व्यावसायिक घडले पाहिजे ही भूमिका असून नाभिक समाजाला कायमच सहकार्य राहिल, अशी ग्वाही शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी दिली आहे.

शेतकरी कामगार पक्ष जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील पुरस्कृत, श्रीसंत सेना महाराज नाभिक समाज संस्था अलिबागच्यावतीने आधुनिक हेअर कटींग मार्गदर्शन शिबीर व सेमिनारचे आयोजन सोमवारी (दि.२३) मॅपल आयव्हीमध्ये करण्यात आले हाते. या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी भारतातील सुप्रसिध्द हेअर डिझायनर उदय टक्के, सौंदर्य तज्ञ हर्षदा टक्के, श्रीसंत सेना महाराज नाभिक समाज संस्था अलिबागचे अध्यक्ष संजय शिंदे, महिला अध्यक्षा नंदिनी इंदूलकर, उपाध्यक्ष नितीन कदम, कार्याध्यक्ष संदीप कदम, सचिव संतोष इंदूलकर, खजिनदार समीर पवार आदी मान्यवरांसह समाजाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व शिबिरार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी भारतातील सुप्रसिध्द हेअर डिझायनर उदय टक्के व सौंदर्य तज्ञ हर्षदा टक्के यांनी प्रात्यक्षिकासहित मोलाचे मार्गदर्शन केले. या शिबिरात अलिबाग तालुक्यातील पोयनाड, रेवदंडा, चौंढी विभागातील तसेच श्रीवर्धन व अन्य तालुक्यातील दोनशेहून अधिक शिबिरार्थींनी सहभाग घेतला होतो. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी माजी अध्यक्ष संतोष पवार, शेखर घाडगे, वैभव मुकादम, वैष्णवी मुकादम, विजया साळुंखे, अ‍ॅड. रश्मी पांडव, अमोद पांडव, प्रदिप जाधव, राजू जाधव, सुर्यकांत शिंदे, आत्माराम साळुंखे, संतोष मोरे, अभिजीत महाले, प्रमोद महाले, संतोष इंदूलकर, स्वप्नील शिंदे, नितेश निमुटकर आदींनी प्रचंड मेहनत घेतली.






**चित्रलेखा पाटील यांचे आभार**

**शेतकरी कामगार पक्ष जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील पुरस्कृत श्रीसंत सेना महाराज नाभिक समाज संस्था अलिबागच्यावतीने आधुनिक हेअर कटींग मार्गदर्शन शिबीर व सेमिनारच्या माध्यमातून अलिबागसह रायगड जिल्ह्यातील शिबिरार्थींना एक वेगळे व्यासपीठ मिळवून दिले. याबद्दल नाभिक समाजाच्यावतीने चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांचे आभार व्यक्त करण्यात आले.**

याप्रसंगी मार्गदर्शन करताना शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील म्हणाल्या, मुंबई, पुणेसह अनेक मोठ्या शहरांमध्ये नवनवीन हेअर कटींग ब्युटीशिअन मेकअपचे शॉप आहेत. नवनवीन बदलामुळे या क्षेत्रातदेखील अमुलाग्र बदल होत आहेत. शहरी भागासह ग्रामीण भागातील मंडळीदेखील या क्षेत्रात चांगली प्रगती करीत आहेत. अलिबाग पर्यटनाच्या दृष्टीने नावारुपाला येत असताना अलिबागमधून चांगले कलाकार घडले पाहिजेत. चांगले व्यावसायिक निर्माण झाले पाहिजेत. अशा पद्धतीने व अशा प्रकारचे सेमिनार व शिबीर घेणे गरजेचे आहे. या शिबिरातून तरुणांना एक चांगले हक्काचे व्यासपीठ मिळणार आहे. या कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय दर्जाचे सुप्रसिध्द हेअर डिझायनर उदय टक्के व सौंदर्य तज्ञ हर्षदा टक्के मार्गदर्शक म्हणून लाभले आहेत. त्यांच्याकडून शिबिरार्थींना मेकअप हेअर डिझायनर बनण्याची मेजवानी त्यांच्या मार्गदर्शनातून नक्की मिळेल, असे प्रतिपादन चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी केले.


श्री.दत्ताराम चाळके


श्री.विवेक जुगादे


श्री.गणेश गाडगीळ

## प्रदेश अध्यक्षपदी दत्ताराम चाळके यांची निवड

। अलिबाग । प्रतिनिधी ।

सहकार भारतीचे १४वे त्रैवार्षिक अधिवेशन दि.२१ व २२ सप्टेंबर रोजी शिर्डी येथे संपन्न झाले. या अधिवेशनात रविवारी (दि.२२) सहकार भारतीच्या सन २०२४ ते २०२७ या तीन वर्षाच्या कालावधीसाठी महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. यामध्ये प्रदेश अध्यक्षपदी दत्ताराम चाळके आणि प्रदेश महामंत्रीपदी विवेक जुगादे यांची बिनविरोध निवड झाली.

यानंतर प्रदेश स्तरावरील नियुक्त्यांची घोषणा करण्यात आली. यात सांगली अर्बन बँकेचे अध्यक्ष गणेशराव गाडगीळ यांची प्रदेश कोषाध्यक्षपदी फेरनिवड झाली. तसेच, सांगली अर्बन बँकेच्या संचालिका अश्विनी आठवले यांची प्रदेश कार्यकारिणी सदस्यपदी निवड झाल्याचे प्रदेश महामंत्री विवेक जुगादे यांनी जाहीर केले.

यावेळी सहकार भारतीचे राष्ट्रीय महामंत्री डॉ. उदय जोशी, राष्ट्रीय संगठन मंत्री संजय पाचपोर, भारतीय रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे, माजी प्रदेश अध्यक्षा शशीताई अहिरे, प्रदेश संपर्क प्रमुख संजय परमणे, महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक फेडरेशनचे अध्यक्ष अजय ब्रम्हेचा, टीजेएसबी बँकेचे अध्यक्ष शरद गांगल, जनता सहकारी बँक पुणेचे अभय माटे आदी मान्यवर तसेच राज्यभरातून विविध जिल्ह्यातील पदाधिकारी उपस्थित होते.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**२७ सप्टेंबर**

१) श्री.भारतनंदन काशिनाथ राणे, रेवस रोड, अलिबाग, २७-९-१९४६

२)श्री.मधुकर दत्तात्रेय देवळे मु.पो.नागाव, अलिबाग, २७-९-१९५३

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**भगवान बाळाजी साने, स्मरणार्थ, चोरोंडे, मापगाव, अलिबाग**

## हुतात्म्यांची स्मारके दीपस्तंभासारखीच प्रेरणादायी

### माजी आमदार बाळाराम पाटील यांचे प्रतिपादन

। चिरनेर । प्रतिनिधी ।

उरण तालुक्यातील चिरनेर येथे हुतात्म्यांच्या शौर्य भूमीत ब्रिटिश राजवटीतील २५ सप्टेंबर १९३०च्या चिरनेर जंगल सत्याग्रहाच्या लढ्याचा ९४ वा हुतात्मा स्मृतीदिन अभिवादन सोहळा बुधवारी (दि.२५) मोठ्या दिमाखात साजरा करण्यात आला. ज्यांच्या बलिदानामुळे भारतीय स्वतंत्र्याची पहाट उगवली त्या हुतात्म्यांची स्मारके पुढील पिढीला दीपस्तंभासारखीच प्रेरणादायी ठरतील, असे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार बाळाराम पाटील यांनी केले.

पुढे बोलताना मा. आ. बाळाराम पाटील म्हणाले की, चिरनेर जंगल सत्याग्रहाचा इतिहास नव्या पिढीला वाचण्याच्या माध्यमातून किंवा अन्य तांत्रिक माध्यमातून समजून द्यायला हवा. यातून विद्यार्थ्यांच्या व जनतेच्या मनामध्ये हा जंगल सत्याग्रहाचा इतिहास ठसून राहिला पाहिजे. या रणसंग्रामाला आज ९४ वर्ष पूर्ण होत आहेत. हुतात्म्यांच्या बलिदानातून मिळालेले स्वातंत्र्य चिरकाल टिकवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. आपल्या पूर्वजांनी दिलेल्या योगदानची नक्कीच दखल घेऊन, नव्या पिढीला भावेल असेच काम आपल्याला करायचे आहे.





दरम्यान, पोलीस दलातर्फे हुतात्मा स्मृतीस्तंभासमोर हवेत बंदुकीच्या तीन फैरी झाडून व बिगुल वाजवून हुतात्म्यांच्या स्मृतींना शासकीय मानवंदना देण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते हुतात्मास्मृती स्तंभाला पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. 'हुतात्मे अमर रहे'च्या ललकारांनी हुतात्म्यांच्या शौर्यभूमीतील शौर्याचा इतिहास जागा झाला. प्रथेप्रमाणे हुतात्म्यांच्या व स्वातंत्र्यसैनिकांच्या नातेवाईकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या अभिवादन सोहळ्याला विद्यमान खासदार, मा. आ. मनोहर भोईर, पनवेलचे माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, उद्योगपती पी.पी. खारपाटील, काँग्रेसचे महेंद्र घरत, पनवेलचे विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, राजेंद्र खारपाटील, नारायण घरत, संतोष ठाकूर, तहसीलदार उद्धव कदम, समीर वाठारकर, पोलीस निरीक्षकक्ष राजेंद्र मिसाळ, दिनेश पाटील, रवींद्र पाटील, भूषण पाटील, शुभांगी पाटील, सरपंच भास्कर मोकल, सचिन घबाडी, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.

## कुसूम पाटील यांचे निधन

। अलिबाग । वार्ताहर ।

नामदेव नगर सांबरी येथील सामाजिक कार्यकर्ते स्व. सिताराम पाटील यांच्या पत्नी कुसूम पाटील यांचे वयाच्या ९५ व्या वर्षी राहत्या घरी निधन झाले.



कुसूम पाटील यांची जनमानसात एक चांगली प्रतिमा होती. त्या नेहमी गोरगरीब, अडल्या नडल्यांना मदत करीत असत. सर्पदंश, विंचूदंश यांवर त्या औषध देत असत. त्यांच्या पश्चात सहा मुलगे, एक मुलगी, सूना, नातू, पणतू असा मोठा परिवार आहे. त्यांचे चिरंजीव सुहास, आनंद हे उच्च पदस्थ सेवानिवृत्त शासकीय अधिकारी आहेत. त्यांचा दशक्रिया विधी रविवारी (दि.२९) होणार असल्याचे पाटील कुटुंबीयांकडून सांगण्यात आले आहे.

## राकेश देवरे अलिबागचे नवे आगार व्यवस्थापक

**अलिबाग :** अलिबागचे एसटी बस आगाराचे व्यवस्थापक अजय वनारसे यांची मुंबई सेंट्रल विभागात बदली झाली आहे. त्यांच्या जागी पालघर विभागातील जव्हार एसटी बस आगारातील व्यवस्थापक राकेश देवर यांची नियुक्ती झाली आहे. राकेश देवरे यांनी सोमवारी (दि.२३) अलिबागचा पदभार हाती घेतला आहे. अजय वनारसे अलिबाग आगारामध्ये जानेवारी २०२० मध्ये आगार व्यवस्थापक वरिष्ठ या पदावर रुजू झाले होते. गेली साडेतीन वर्षे त्यांनी अलिबागचे आगार व्यवस्थापक म्हणून कामकाज पाहिले आहे. आगारातील उत्पन्न वाढावे यासाठी त्यांनी प्रयत्न केले होते. त्यांनी अलिबाग-पनवेल फेऱ्यांवर भर दिला होता. नवे व्यवस्थापक राकेश देवरे यांनी गेली १४ वर्षे एसटी महामंडळात सेवा केली आहे. गेली काही वर्षे ते जव्हार आगारात कार्यरत होते. त्यांनी चांगले काम केल्याची माहिती समोर येत आहे.

## हत्येचा प्रयत्न करणारा गजाआड

### ■ मांडवा सागरी पोलीसांची कारवाई
### ■ न्यायालयाने सुनावली दोन दिवस कोठडी

। अलिबाग । प्रतिनिधी ।

किरकोळ कारणावरून एकाच रुममध्ये राहणाऱ्या कामगाराने दुसऱ्या कामगारावर जीवघेणा हल्ला केला. त्याच्या डाव्या कुशीत सुरी खूपसून त्याची हत्या करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणातील आरोपीला अवघ्या काही तासातच पकडण्यात मांडवा पोलिसांना यश आले. आरोपीला गुरुवारी (दि.२६) दुपारी न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्याला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावल्याची माहिती पोलिसांनी दिली.

सदानंद मलिक असे या आरोपीचे नाव असून बलदेव मलिक असे जखमीचे नाव आहे. हे दोघेही मुळचे ओरीसा राज्यातील असून सध्या अलिबाग तालुक्यातील झिराड पाडा येथे राहत आहेत. गेल्या अनेक महिन्यांपासून झिराडपाडा येथे सुरु असलेल्या बांधकाम ठिकाणी ते बिगारी म्हणून काम करीत होते. याच परिसरात कामगारांच्या राहणाऱ्या पत्र्याच्या रुममध्ये एकत्र राहत होते. मंगळवारी (दि.२४) सायंकाळी एकाच रुममध्ये असताना सदानंद हा बडबड करीत होता. यावेळी बलदेव याने त्याला बडबड करू नको असे सांगितले. त्याचा राग धरून आरोपी सदानंद याने भाजी कापण्याच्या सुरीने बलदेव याच्यावर जीवघेणा हल्ला केला. यामध्ये बलदेव हे गंभीर जखमी झाले. याप्रकरणी मांडवा सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.




घटनेचे गांभीर्य ओळखून सहाय्यक पोलीस निरीक्षक डी. आर. भोई यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुमित खोत यांनी तपासाची सुत्रे हालवली. काही तासातच आरोपीला गजाआड करण्यात पोलिसांना यश आले.

## मेथा महाविद्यालयात विद्यार्थ्यांशी संवाद




। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव येथील जे.बी.सावंत एजुकेशन सोसायटीच्या टिकमभाई मेथा वाणिज्य महाविद्यालयात गुरूवारी (दि.२६) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग तसेच माहिती तंत्रज्ञान सहाय्यक केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने करियर कट्टा आयोजित विध्यार्थी संवाद उपक्रम घेण्यात आला. यावेळी ९० विध्यार्थी उपस्थित होते.

महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र मुंबईचे अध्यक्ष यशवंत शितोळे यांनी विध्यार्थ्यांशी संवाद साधताना मोबाईलचा वापर चांगल्या पुस्तकांच्या वाचनासाठी करावा, असे आवाहन केले. पालकांशी असणारा संवाद दिवसेंदिवस कमी होत असल्याची खंत देखील त्यांनी व्यक्त केली. प्रास्ताविकात बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य हर्षल जोशी यांनी करिअर कट्ट्याच्या उपक्रमांबद्दल माहिती दिली. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व उद्योजक आपल्या भेटीला तसेच छोटे कोर्सेस या उपक्रमांतर्गत सुरु असून त्याचा फायदा विध्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन प्रा.अशोक मोरे तालुका समन्वयक यांनी केले.

## महिला आघाडी संवाद बैठक


। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत विधानसभा मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा भगवा फडकवण्यासाठी महिला आघाडी सज्ज आहे, असा निर्धार महिला आघाडी संवाद बैठकीत महिला पदाधिकारी आणि शिवसैनिकांनी केला आहे. शिवसेना महिला आघाडीच्या सेनाभवनातील पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी कर्जत विधानसभा मतदारसंघातील महिला आघाडीची संवाद निर्धार बैठक आयोजित केली होती. यावेळी शिवसेना ठाकरे पक्षाचे उपजिल्हा प्रमुख नितीन सावंत यांच्यासह माजी महापौर स्नेहल आंबेकर, सुवर्णा जोशी, रेखा ठाकरे, समिक्षा सक्रे, नेहा माने, श्रेया परब, अनिता पाटील, सुमन डोंगरे, करुणा बडेकर, साधना राऊळ, शैला भगत, वैजयंती गायकवाड, सुविधा विचारे, रंजना राणे, सुजाता मनवे, धनश्री चंदन, नीता मांडे, मीना कुलकर्णी आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

## नलिनी मालोरे यांचा सन्मान

**माणगाव :** नालंदा ऑर्गनायझेशन महाराष्ट्र राज्य आयोजित राज्यस्तरीय नालंदा, ग्राम समृद्धी पुरस्कार माणगाव तालुक्यातील आमडोशी येथील नलिनी मालोरे-घुलघुले यांना प्राप्त झाला आहे. नालंदा ऑर्गनायझेशन महाराष्ट्र राज्य यांच्याकडून शेती क्षेत्रातील उल्लेखनीय केलेल्या कामगिरीसाठी 'आदर्श कृषी सहाय्यक' हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. हा पुरस्कार सोहळा रविवारी (दि.२२) पुण्यातील पत्रकार भवन येथे पार पडला. जितेंद्र दात, अनिल अयाचित यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. नलिनी या मुळशी तालुक्यात कृषी सहाय्यक या पदावर कार्यरत आहेत.

**● रायगड आणि सातारा जिल्ह्याच्या मध्यभागी असलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा आवडत्या प्रतापगड किल्ल्यावर सद्य:स्थितीत परिस्थीतीत कधी पाऊस तर कधी ऊनं पडत असल्याने गड हिरवाईने नटलेला आहे. निळं आभाळ आणि भवतालच्या डोंगरावर पसरेली पांढरी शुभ्र ढगांची झालर यामुळे किल्ल्याच्या सौंदर्यात आणखी भर पडली आहे.**


● (छायाचित्र- सुधीर नाझरे)

## तरुणाईला लागले नवरात्रीचे वेध

### नवरात्र मंडळांची जोरदार तयारी सुरु

। सुकेळी । वार्ताहर ।

गणेशोत्सवानंतर आता तरुणाईला नवरात्री उत्सवाचे वेध लागले आहेत. नवरात्रीची धुम हळुहळू सर्वत्रच पहायला मिळत आहे. परंतु, या सगळ्यात सर्वात जास्त मुर्तीकारांची घाई दिसत आहे. देवीच्या मुर्तीची कामे अंतिम टप्प्यात आली असुन मुर्तीच्या फिनिशिंगकडे जास्त लक्ष दिले जात आहे. शहरात तसेच ग्रामीण भागातही नवरात्रीचा उत्सव हा उत्साहात साजरा केला जातो. अनेक मंडळे देवीच्या भव्य मूर्तींची प्रतिष्ठापना करत असतात. यामुळे अनेक मंडळे आता नवरात्रीच्या उत्सवाच्या जोरदार तयारीला लागले आहेत.



दरम्यान, ग्रामीण भागातही तरुणवर्गांचे नवरात्र उत्सवाचे नियोजन सुरू आहेत. ही मंडळे शहरांच्या तुलनेने छोटी असतात, मात्र उत्साहात कोठेही कमतरता नसते. ग्रामीण भागातही ध्वनिफितीच्या ताळावर रास गरबा जोरदार रंगतो. यामुळे सध्या सर्वच मंडळांना आता नवरात्रीचे वेध लागले आहेत.

**अलिबाग नगरपरिषद**
**आरोग्य विभाग**
**ई-निविदा सुचना सन २०२४-२५**

अलिबाग नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाकडील ई-निविदा सुचनेमध्ये अलिबाग नगरपरिषदेस ग्रीन वेस्ट श्रेडर मशिन पुरविणे व नियोजित ठिकाणी बसवून देणे या कामासाठी ई निविदा मागविण्यात येत आहेत. सविस्तर ई-निविदा सुचना शासनाच्या https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २७-०९-२०२४ रोजी पासून उपलब्ध होईल. सदर कामाच्या निविदा प्रक्रियेत कोणताही बदल/ सुधारणा असल्यास वरील संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**सही/-**
**मुख्याधिकारी,**
**अलिबाग नगरपरिषद**

# श्रीलंकेचे डावे वळण

निवडणुकीत मते कमीअधिक झाली म्हणून डावा विचार नामोहरम किंवा नष्ट होऊ शकत नाही. कारण तो कष्टकऱ्यांच्या व गरिबांच्या हिताचा विचार आहे. श्रीलंकेत याचेच प्रत्यंतर आले आहे. तेथे मार्क्सवादी विचारसरणीचे अनुरा कुमारा दिसानायके हे अध्यक्ष झाले आहेत. २०१९ च्या निवडणुकीत दिसानायके यांच्या पक्षाला केवळ तीन टक्के मते मिळाली होती. त्यामुळे त्यांची टिंगल होत होती. पण गेल्या दोन वर्षात श्रीलंकेची जनता भयानक महागाई व बेकारीने पोळून निघाली. इतर कोणतेही पक्ष आपल्याला तारू शकणार नाहीत याची तिला खात्री पटली. आणि तीन टक्केवाले दिसानायके पाच वर्षानंतर थेट राष्ट्राध्यक्ष झाले. श्रीलंकेत अध्यक्षांना निवडून येण्यासाठी पन्नास टक्क्यांहून अधिक मते लागतात. दिसानायके यांना पहिल्या फेरीत ४२ टक्केच मते मिळाली. पण नंतरच्या फेरीत ते निवडून आले. तरीही त्यांच्या विजयाचे मोल कमी होत नाही. श्रीलंकेचे आजवरचे अध्यक्ष हे कोलंबोमधल्या उच्चभ्रू, उच्चशिक्षित भंडारनायके, प्रेमदास, विक्रमसिंगे अशा कुटुंबांमधून आले आहेत. त्यामुळे सत्ता कोणत्याही पक्षाची असली तरी ती ठराविक वर्तुळातच फिरत राहिली आहे. दिसानायके यांच्या रुपाने देशाला पहिल्यांदाच ग्रामीण पार्श्वभूमी असलेला अध्यक्ष मिळणार आहे. शाळा-कॉलेजात असल्यापासून दिसानायके यांचा राजकारणाकडे ओढा होता. जनता विमुक्ती पेरामुना या पक्षाशी ते जोडले गेले. कट्टर डाव्या विचारसरणीचा म्हणून तो ओळखला जातो. १९७१ आणि नंतर १९८७ मध्ये या पक्षाने जनतेतून दोन सशस्त्र उठाव करण्याचे प्रयत्न केले होते. देशातील प्रस्थापित राजकीय पक्षांची धोरणे गरिबांसाठी मारक असून अमेरिकी कंपन्यांचे हित जपणारी आहेत अशी त्याची प्रथमपासूनची भूमिका होती. आपल्याकडच्या नक्षलवादी पक्षांप्रमाणेच सशस्त्र क्रांतीवर त्याचा विश्वास होता. मात्र काळाच्या ओघात त्यात बदल होत गेले व तो संसदीय राजकारणात सहभागी होत गेला. दिसानायके यांची अध्यक्षपदी निवड हे त्या बदलांचेच फळ आहे.

### गाठ आहे नाणेनिधीशी

गेली दोन-तीन वर्षे श्रीलंकेसाठी अत्यंत वाईट होती. या देशाची अर्थव्यवस्था मुख्यतः पर्यटनातून येणाऱ्या उत्पन्नावर अवलंबून आहे. कोविडच्या काळात हे उत्पन्न पूर्णपणे ठप्प झाले. याखेरीज मसाल्याचे पदार्थ, चहा इत्यादींची जी काही थोडीफार निर्यात होती तीही बंद पडली. त्यामुळे देशाचे प्राण कंठाशी आले. महागाई भयंकर वाढली. त्यातून लोकांचा उद्रेक झाला. इतका की, अध्यक्ष गोटाबाय राजपक्षे यांना सिंगापूरला पळून जावे लागले. लोक त्यांच्या प्रासादात खुलेआम घुसले आणि तिथल्या वस्तू त्यांनी पळवल्या. अलिकडे बांगलादेशात तेच दृश्य पुन्हा शेख हसिनांच्या बाबत पाहायला मिळाले. राजपक्षे गेल्यानंतर बराच काळ निर्नायकी होती. मग आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचा प्रवेश झाला. अमेरिका व इतर देशांनी नाणेनिधीच्या आडून श्रीलंकेच्या अर्थव्यवस्थेवर ताबा मिळवला. कर्जे दिली. पण त्यासाठी प्रचंड अटी टाकण्यात आल्या. परदेशी कंपन्यांचा शिरकाव होऊ लागला. चीनही येथे शिरकाव करण्यासाठी प्रयत्न करतो आहेच. या सर्वांच्या उपद्व्यापांचा परिणाम हाच की, श्रीलंकेतील जनतेची स्थिती अधिक बिकट झाली आहे. सुमारे पाच लाख लोकांच्या नोकऱ्या गेल्या आहेत. वीज, गॅस, पेट्रोल भयानक महाग झाले आहे. विजेची बिले भरता न आल्याने दहा लाख लोकांच्या घरी दिवे नाहीत. अनेकांनी गॅस परवडत नाही म्हणून पुन्हा चुलीवरचे स्वयंपाक सुरू केले आहेत. दोनतृतियांश लोक दारिद्र्यरेषेखाली आहेत. नेहमीच्या जीवनावश्यक वस्तूंवर अठरा टक्के व्हॅट आहे. त्यामुळे भारत किंवा बांगलादेशात जी वस्तू शंभर रुपयांना मिळते तिच्यासाठी इथे पाचशे किंवा हजार रुपये मोजावे लागतात. मधल्या काळात औषधांची आयात बंद झाल्याने लोक हवालदिल होते. आता ती उपलब्ध आहेत. पण त्यांच्या किंमती ऐकूनच लोकांना हृदयविकाराचे झटके यावेत अशी स्थिती आहे. ही सर्व स्थिती बदलण्याचे आश्वासन देऊन, व्हॅट वगैरेत कपात करू आणि परकीय कंपन्यांना चाप लावू असे सांगून दिसानायके सत्तेत आले आहेत.

### भारतासोबतचे संबंध

दिसानायके यांचा पक्ष मार्क्सवादी-लेनिनवादी विचारधारा मानतो. त्यामुळे त्यांच्याकडून गरिबांसाठी कल्याण कार्यक्रम राबवण्याची अपेक्षा होईल. पण ते सोपे नसेल. कारण, सरकारपाशी पैसे नाहीत. नाणेनिधीकडून कर्जाचा पुढचा हप्ता आता येणार आहे. पण त्यासाठी त्याच्या अटी मान्य कराव्या लागतील. विजेचे, गॅसचे दर कमी करता येणार नाहीत. तोट्यातल्या सरकारी कंपन्या बंद कराव्या लागतील. ते त्यांना शक्य होईल का हे पाहावे लागेल. भारतासंबंधात काय भूमिका घ्यायची हाही त्यांच्यापुढचा पेच असेल. कारण गेल्या दोन वर्षात आर्थिक अडचणींमध्ये सर्वाधिक चारशे कोटी डॉलरची मदत भारताने केलेली आहे. याखेरीज अनेक बाबतीत भारतावर तो देश अवलंबून आहे. मात्र पूर्वापार त्यांच्या पक्षाने भारताच्या या वर्चस्वाला विरोध केला आहे. दुसरे म्हणजे त्यांचा पक्ष डावा असला तरी देशावर सिंहलींचे वर्चस्व राहायला हवे अशीही त्याची एक भूमिका आहे. हे तेथील अल्पसंख्य तमिळींच्या हिताच्या विरोधी आहे. तमिळींनी स्वतंत्र प्रदेशासाठी तिथे यादवी माजवली व त्यात १९८७ मध्ये भारताने हस्तक्षेप केला होता. त्यालाही दिसानायके व इतरांचा विरोध होता. आता तमीळ फुटीरतावाद जवळपास नष्ट झाला आहे. मात्र भारताबाबतचा आकस अजूनही कायम आहे. त्यामुळे दिसानायके यांच्या आगमनामुळे भारताला आणखी एक डोकेदुखी तयार झाली आहे की काय हे लवकरच कळेल. काहीच दिवसांपूर्वी भारताच्या मित्र असलेल्या शेख हसीनांना पळून यावे लागले. त्यामुळे बांगलादेशात आता विरोधी जमात पक्षाचा वरचष्मा वाढणार आहे. मालदीवमध्येही भारतविरोधी अध्यक्ष सत्तेत आहेत. ही चांगली लक्षणे नाहीत. विचारसरणीच्या दृष्टीने दिसानायके यांना चीन अधिक जवळचा आहे. पण चीनबाबत आता जनतेत चांगले मत नाही. चीनने हंबनटोटा बंदराच्या विकासासाठी श्रीलंकेला मदत केली. पण नंतर त्यासाठी चीनकडून घेतलेले कर्ज हा सावकारी पाश असल्याचे श्रीलंकेच्या जनतेच्या लक्षात आले. एकूण, अध्यक्ष तर डावे झाले, पण श्रीलंका कोणत्या मार्गाने जाणार हे पाहावे लागेल.

विचार

# आयटी कंपन्यांमध्ये एवढा ताण कशाचा?

***बड्या तसेच बहुराष्ट्रीय कंपन्यांमधील नोकरीभोवतीचे वलय गेल्या काही वर्षांमध्ये काहीसे फिकट झाले आहे. कामाचा अतीताण आणि त्यामुळे होणाऱ्या मानसिक-शारीरिक त्रासाच्या घटनांमुळे खळबळ माजली आहे. अलिकडेच एका मोठ्या कंपनीत काम करणाऱ्या ॲना सेबेस्टियन या मुलीचा अतीकामाच्या ताणाने मृत्यू झाला. कर्मचाऱ्यांना हृदयविकाराचा झटका यावा, इतका ताण या कंपन्यांमधील कर्मचाऱ्यांवर का असतो?***



**प्रसाद देशपांडे**

कोणताही कर्मचारी नोकरी करतो ते कारकिर्द घडवण्यासाठी आणि पैसा कमावण्यासाठी. काम केल्याबद्दल मिळणारा पगार त्याला काम करण्यासाठी प्रोत्साहित करतो. अधिक काम करण्याबद्दल अधिक पैसे मिळणार असतील तर तो आनंदाने तयार होतो. मग ती आयटी कंपनी असो, मॅन्युफॅक्चरिंग किंवा सरकारी कंपनी असो अथवा सेवा देणारी कंपनी असो. काम करण्यासाठी आलेली व्यक्ती स्वत:हून कंपनीत अर्ज करते, मुलाखत देते, सर्व अटी मान्य करते आणि स्वेच्छेने काम स्वीकारते. एक कर्मचारी म्हणून तुम्ही कंपनीला उत्कृष्ट संख्यात्मक आणि गुणात्मक आउटपुट दिले पाहिजे, ही वरिष्ठांची अपेक्षा असते. पण, आपल्या हाताखालच्या कर्मचाऱ्यावर, त्याच्या प्रकृतीवर वाईट परिणाम व्हावा इतका कामाचा ताण असेल तर ते नक्कीच गैर आहे. इतर सर्व कंपन्यांप्रमाणेच आयटी कंपन्यांमध्येही दोन प्रकारच्या जबाबदाऱ्या असतात. एचआर, फायनान्स किंवा सपोर्ट डिपार्टमेंटमध्ये काम करणारे लोक आणि मार्केटिंगसाठी किंवा ग्राहकांसाठी प्रत्यक्ष काम करणारे कर्मचारी. अर्थातच बाहेर सेवा पुरवणाऱ्यांना कंपनीकडून टारगेट्स दिली जातात. ती पूर्ण करण्यासाठी वेळेची मर्यादाही दिली जाते. अशा विभागांमध्ये नक्कीच कामाचा ताण असू शकतो. कधी कधी आयटी कंपन्यांमध्ये एखाद्या प्रोजेक्टवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्याचा पगार ग्राहक कंपनीकडून दिला जातो. अशा वेळी ती ग्राहक कंपनी वेळेची मर्यादा घालून ताण वाढवू शकते.

मोठ्या कंपनीत काम भरपूर असते आणि कालमर्यादेमुळे ताणही असतो, पण तरीही वर्षभर रात्रंदिवस सातत्याने काम करावे लागेल अशी स्थिती कोणत्याही कंपनीत कधीही नसते. क्वचित एखादा अर्जंट प्रोजेक्ट असू शकतो. पण ३६५ दिवस असे काम नक्कीच नसते आणि तसे असेल तर कंपनीच्या प्लॅनिंग शेड्यूलमध्ये नक्कीच काही तरी गोंधळ असतो. कारण अनेक कंपन्या सेवा पुरवताना पुढे आणखी कुणाला तरी सेवा देत असतात. उदाहरणार्थ, बँकिंग, इन्शुरन्स, सरकारी, निमसरकारी किंवा खाजगी संस्था. त्यात हॉस्पिटल्स असतात, हेल्थकेअर सेवासंस्था असतात, एनजीओ असतात किंवा आणखी कुणीही असू शकते. मात्र त्या क्लायंट कंपन्याना घाई असेल तर त्याचा ताण संबंधित कंपनीवर येतो, पण तरीही सतत अशी स्थिती नक्कीच नसते.

कर्मचाऱ्यांवर ताण येण्याची कारणे ही काही प्रमाणात कंपनीच्या कामाच्या स्वरूपावर आणि कामाच्या पद्धतीवर अवलंबून असतात. त्यासाठी आजकाल 'वर्क कल्चर' असा शब्द वापरला जातो. प्रत्येक कंपनीची कार्यपद्धती, व्यवस्थापन प्रणाली आणि त्या विभागाच्या व्यवस्थापकांचा कामाकडे पाहण्याचा दृष्टिकोन यासंदर्भात मोठी भूमिका बजावतो. सर्वसामान्यत: व्यवस्थापन तीन पातळ्यांवर काम करते. उच्च, मध्यम आणि निम्न पातळी. कामाचा ताण सर्वांनाच असतो. किंबहुना, मॅनेजमेंटमध्ये पद जितके उच्च, तितका ताण अधिक. कामाचा ताण वरच्या लोकांकडून हाताखाली काम करणाऱ्या अधिकाऱ्यांकडे आणि त्यांच्याकडून कर्मचाऱ्यांकडे ढकलला जातो. अनेकदा कार्यक्षमता सिद्ध करण्यासाठी किंवा प्रमोशन मिळवण्यासाठी काही मॅनेजर्स आपल्या कर्मचाऱ्यांवर दहा दिवसांचे काम पाच दिवसात पूर्ण करण्यासाठी सक्ती करतात. अशा वेळी प्रत्यक्ष काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर ताण येतो. त्यातच कामाच्या पूर्ततेसंबंधी सतत पाठपुरावा करणे, अपमानास्पद भाषेचा उपयोग करणे यामुळे कर्मचाऱ्यांचे मनोधैर्य खच्ची होते आणि ताण वाढू लागतो.

एखाद्या कर्मचाऱ्याचा कामाचा वेग कमी असतो. कधी तरी कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्यामुळे कामाचे ओझे वाढते किंवा काही लोकांना लहान-सहान गोष्टींचा ताण येतो. अशा प्रत्येक वेळी कर्मचाऱ्यांचा ताण वाढत राहतो. त्या ताणाचा त्यांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो. त्यामुळे तो ताण वरच्या अधिकाऱ्यांकडे सरकत जातो आणि पुन्हा वाढून खाली येतो. या विषारी चक्राचा कंपनीवर, कंपनीच्या कर्मचाऱ्यांवर, उत्पादकतेवर आणि पर्यायाने कंपनीच्या प्रतिमेवर होतो. कधी कधी विशिष्ट प्रकारच्या कामासाठी एखाद्या कर्मचाऱ्याची कौशल्ये उपयोगी नसतात. परंतू तो हट्टाने ते काम स्वीकारतो आणि ते नीट जमत नाही. त्यामुळे त्याच्यावर आणि अधिकाऱ्यांवर ताण येतो. ताण वाढवणाऱ्या घटना घडतच नाहीत किंवा घडणारच नाहीत, असे आपण म्हणू शकत नाही. परंतु असे घडू नये यासाठी सगळ्या मोठ्या कंपन्या सजग असतात. सगळ्या मोठ्या आणि ब्रँड कंपन्यांमध्ये हजारो, लाखो कर्मचारी विविध पातळ्यांवर काम करत असतात. कंपन्यांनाही चांगल्या कर्मचाऱ्यांची गरज असतेच. त्यामुळे बहुतेक कंपन्यांमध्ये 'रिटेनिंग पॉलिसी' राबवली जाते. कर्मचाऱ्यांनी कंपनी सोडून जाऊ नये यासाठी प्रयत्न केले जातात. किंबहुना, या मोठ्या कंपन्यांमध्ये कर्मचारीकेंद्रित धोरणेच राबवली जातात. विशेषत: स्त्री कर्मचाऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातात. बरेच वेळा कर्मचारी या बाबतीत जागरूक नसतात. त्यांना याची माहिती नसते आणि ते करूनही घेत नाहीत. बहुतेक सर्व बड्या किंवा बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये व्हिसल ब्लोअर फंक्शन अस्तीत्वात आहे. कंपनी अत्यंत तत्परतेने या तक्रारीची शहानिशा करून निर्णय घेते. ठराविक काळानंतर त्याचा रिव्हयू घेतला जातो. एकही तक्रार दुर्लक्षित राहणार नाही, याची काळजी घेतली जाते. विशेष म्हणजे कंपनीने काढून टाकलेले किंवा कंपनी सोडून गेलेल्या तक्रारींचीदेखील रीतसर चौकशी केली जाते आणि अधिकारी दोषी आढळले तर त्यांच्यावर कारवाईही केली जाते. अर्थात हे अहवाल सार्वजनिकरित्या जाहीर करणे- न करणे ही कंपनीची पॉलिसी असते. पण सर्व कायदेशीर नियमांचे आयटी कंपन्या अत्यंत काटेकोरपणे पालन करतात. अगदीच वेळ आली तर पोलिसांनादेखील पूर्ण सहकार्य करतात. कारण तसे न केल्यास त्यांच्यावर सरकारी कारवाई होण्याचा आणि कंपनीच्या प्रतिमेला धक्का लागण्याचा धोका असतो.

बड्या कंपन्यांमध्ये काम करणाऱ्यांना हिताचे रक्षण करणाऱ्या सर्व नियमांची माहिती असणे आवश्यक आहे.आपले वरिष्ठ आणि त्या साखळीतले सर्वात वरिष्ठ अधिकारी कोण आहेत याविषयी कर्मचाऱ्याला माहीत असणे आवश्यक आहे. तरच त्याला योग्य व्यक्तिबद्दल योग्य त्या मार्गाने तक्रार करता येईल. विशेष म्हणजे गेली अनेक वर्षे बहुतेक सर्व बड्या कंपन्यांमध्ये कर्मचाऱ्यांच्या हिताचे रक्षण करणाऱ्या या व्हिसल ब्लोअर फंक्शनची माहिती प्रत्येक कर्मचाऱ्याला व्हावी, यासाठी एक ऑनलाइन कोर्स पूर्ण करावा लागतो. त्यात कर्मचाऱ्यांचे हक्क आणि अधिकार याविषयी माहिती दिली जाते. त्या विषयाची लेखी परीक्षा घेतली जाते आणि ८० पेक्षा अधिक गुण असतील तर प्रशस्तीपत्रक दिले जाते. त्यामुळे कोणत्याही प्रकारचा अन्याय होत असेल तर त्याची तक्रार कर्मचाऱ्याने नि:संकोचपणे करणे अपेक्षित आहे. तसे न घडल्यास त्यामागच्या कारणांची बारकाईने चौकशी व्हायला हवी. अर्थात करियरच्या आणि स्पर्धेच्या जगात असे मॅनेजर्स असू शकतात, जे स्वत:च्या प्रगतीसाठी हाताखालच्या लोकांना दिलेल्या वेळेपेक्षाही लवकर कामे पूर्ण करण्यासाठी मागे लागतात. काहीजण स्वत:च प्रचंड काम करतात. त्यामुळे कर्मचाऱ्याकडूनही त्यांच्या तशाच अपेक्षा असतात. परंतु आपल्यावर असहनीय ताण येत असेल तर तक्रार करायलाच हवी. सहन करण्याची काहीही गरज नाही. याव्यतिरिक्त अनेक आयटी कंपन्यांमध्ये एचआर विभाग यासाठी सतत काम करत असतो. माझं प्रमोशन झालं नाही, माझा मॅनेजर वेडेवाकडे बोलतो इथपासून चहाकॉफीचे मशीन बिघडले आहे, इथपर्यंत तक्रारी केल्या जातात आणि त्यांचा गंभीरपणे विचार केला जातो. काही कंपन्यांमध्ये '३६० फीडबॅक' सिस्टिम वापरली जाते. मॅनेजर्सविषयी तीन लेव्हलचे लोक फीड बॅक देतात. त्याचा बॉस, त्याच्याच पातळीवर काम करणारा दुसऱ्या विभागाचा सहकारी आणि त्याच्या हाताखाली काम करणारे कर्मचारी. त्यामुळे प्रत्येक अधिकाऱ्याचे वागणे, बोलणे, त्याची तत्वे याविषयी माहिती मिळवली जाते आणि ती त्याच्यापर्यंत पोचवली जाते. त्यामुळे संबंधित मॅनेजर स्वत:मध्ये सुधारणा करू शकतो. शेवटी एक गोष्ट नक्की की ताण असणार, पण तो किती आणि कसा सहन करायचा हे त्या कर्मचाऱ्याने स्वत: ठरवायला हवे. तुमच्या मदतीसाठी अनेकजण आहेत. अनेक मार्ग आहेत, पण तुम्हाला मदतीची गरज आहे हे त्यांच्यापर्यंत पोचायला हवे आणि ते तुम्हीच सांगायला हवे.

**(लेखक पुण्यातील एका मोठ्या आयटी कंपनीमध्ये उच्चपदस्थ आहेत.)**

आजकाल

# तिरुपतीतील भेसळीच्या निमित्ताने

**हेमंत गोळे**

तिरुपती प्रसादामधील तुपातल्या भेसळीचे प्रकरण जाणून घ्यायचा प्रयत्न करतो आहे. एक मत असे वाचनात आले की आपण ज्याला लोणकढे तूप म्हणतो ते साधारणपणे किलोला रु. सहाशे यापेक्षा कमी दराने विकणे परवडणार नाही. पण तूप पुरवठा करणारी कंपनी रु ३८०/- या दराने पुरवठा करीत होती. म्हणजे कोणत्या तरी स्वस्त चरबीची त्यामध्ये भेसळ असली पाहिजे. त्याशिवाय काही हे शक्य नाही. वनस्पती तेलांपासून वनस्पती तूप मिळवता येते ही सर्वज्ञात गोष्ट आहे. पण त्यामुळे शाकाहाराचा काही भंग होणार नाही. मारलेल्या प्राण्यांच्या चरबीचे तसे नाही. ही चरबी स्वस्त असते. एका मित्राकडून ऐकले होते की ज्या एका बेकरीचे तो नेहमीचे गिऱ्हाईक होता त्या बेकरी मध्ये प्राण्यांची चरबी आणून ठेवलेली त्याने अपघाताने बघितली होती. त्या बेकारीच्या 'खाऱ्यांचा' तो चाहता होता. त्या खाऱ्यांचा कुरकुरीतपणा हा त्या चरबीचा गुण असणे शक्य होते.

आपण घरी तूप करतांना दूध दही लोणी तूप या क्रमाने जातो. पण मोठ्या डेअऱ्यांमध्ये दुधामधून क्रीम (म्हणजे दुधातील चरबी) यंत्रांनी घुसळून वेगळी करतात, त्याला विरजण लावतात आणि त्यापासून लोणी काढतात. क्रीम विकत आणून या पद्धतीने त्यापासून लोणी तूप मिळविणे या मार्गाचा अवलंब घरी करणारे देखील लोक आहेत. पण आयुर्वेदाशी निष्ठा बाळगणारे काहीजण (उदा बालाजी तांबे) याला शास्त्रोक्त तूप समजत नाहीत. पारंपरिक मार्गाने बनविल्या जाणाऱ्या तुपाचाच औषध म्हणून वापर केला पाहिजे असा त्यांचा आग्रह असतो.

क्रीमला विरजण लावता येते तसे विरजण म्हणे प्राणिज चरबीला लावता येते आणि त्यापासून लोण्यासारखे लोणी मिळू शकते असे एका जाणकार मित्राकडून ऐकले. स्वाद गंध वगैरे गुण सूक्ष्मजीवांवर अवलंबून असावेत असे दिसते. बऱ्याच शाकाहारी माणसांना क्रीमला विरजण लावून त्यापासून बनविलेले लोणी तूप चालू शकेल पण चरबीपासून तसेच लोणी बनविले तर चालणार नाही. शेणापासून बनविलेला गोबर गॅस ( ज्याला मा प्र से गटर गॅस म्हणाले तो वायू - मिथेन ) चालतो पण त्या गोबर गॅस प्लँटला संडास जोडलेला असेल तर तो गटर गॅस पकोडे तळायला वापरायच्या कल्पनेने त्यांना उलटी होईल.

तिरूपती देवस्थानला घृतपुरवठा करणाऱ्या कंपनीचे म्हणणे आहे की, त्यांनी पुरविलेल्या तुपाच्या आवश्यक त्या विविध चाचण्या ते करतात आणि त्याबद्दलची प्रमाणपत्रे त्यांचेकडे आहेत. या प्रकरणाची खरोखर चौकशी झाली तर यामागील तथ्ये सामोरी येतीलच. पण ते चाचण्या करीत असतील निदान प्रमाणपत्रे तरी मिळवीत असतील यावर माझा विश्वास आहे. धंदेवाले आहेत. असा गलथानपणा त्यांचे हातून होणार नाही. पंचवीस वर्षे ते असा पुरवठा करीत आहेत.

चंद्राबाबू नायडू आणि ते लोकेश म्हणून जे कोणी चिरंजीव आहेत ते मात्र मोठे इंटरेस्टिंग आयटेम आहेत (ओएमजी मधील सिद्धेश्वर महाराजांसारखे). चंद्राबाबू पूर्वी एनडीए मध्ये होते. पराभव झाल्यावर त्यांच्या लक्षात आले की मुस्लिम मतदारांनी त्यांचेकडे पाठ फिरवली आह . मग लगेच ते एन डी ए च्या बाहेर पडले. लोकसभा निवडणुकीपूर्वी ते पुन्हा एनडीए मध्ये आले. यावेळी त्यांना 'हिंदुत्वाने' हात दिला. त्यामुळे ते पुन्हा हिंदुत्वाचा वापर करीत असावेत. वायएसआर रेड्डी हे ख्रिस्ती होते, त्यांचे कुटुंब ख्रिस्ती आहे हे खरे. पण याचा तिरूपती देवस्थानशी काय संबंध? हे मला समजले नाही. देवस्थानचा कारभार काही जगनमोहन रेड्डी बघत नव्हते. प्रसादामधील भेसळीसाठी जगन रेड्डी कसे काय जबाबदार ठरतात?

काही हिंदू संघटनांचा गेली काही वर्षांपासून आग्रह आहे की हिंदू देवस्थानांच्या कारभारात सरकारचा हस्तक्षेप नको. देवस्थान विश्वस्तांमध्ये एक सरकारी अधिकारी विश्वस्त असतो त्यावर त्यांचा रोख असावा असे मी समजतो. आणि हेच लोक वक्फ बोर्डाची स्वायतत्ता कमी करण्याचा आग्रह धरीत आहेत. एकूण यामधून काही निघेलसे दिसत नाही. येन केन प्रकारेण असा हा प्रकार दिसतो आहे.

मी यामधून घेतलेला धडा म्हणजे 'होता होईतो बाहेरचे खाऊ नये. तशी वेळच आली, पर्यायच नसेल तेव्हा त्यात नक्की काय आहे? हा विचार करून उगी डोक्याला ताप करून घेऊ नये.'

**साभार**

लोकसंसद

## फोफावलेल्या शहरी नक्षलवादाचा धोका

बाह्य शत्रूपेक्षा अंतर्गत शत्रूचा देशाला फार मोठा धोका आहे. फोफावलेला 'शहरी नक्षलवाद' याचाच एक भाग होय. जे.एन.यु. किंवा अलिगढ मुस्लिम विद्यापीठातून सांस्कृतिक कार्यक्रम अथवा देशप्रेमी संघटनांचे समाजबांधणीचे, राष्ट्रहिताचे कार्यक्रम होऊ दिले जात नाहीत. शहरी नक्षलवादाची ही उदाहरणे परिचित आहेत. पण काही नेते मंडळींच्या धोरणातूनही हा नक्षलवाद जोपासला जात आहे, त्याला खतपाणी घातले जात आहे. नुकतेच ठाणे येथील संभाजी ब्रिगेडच्या अधिवेशनात ज्ञानेश महाराव यांनी प्रभु श्रीराम आणि श्री स्वामी समर्थ यांच्यावर अतिशय खालच्या पातळीवरून टीका केली. रामासारख्या भारताच्या आराध्य दैवतावर केलेली टीका ही प्रभू श्रीराम यांचे विडंबन तर आहेच तसेच हा शहरी नक्षलवादाचा सुद्धा भाग आहे. नक्षलवाद हे मार्क्सवादाचे पालटलेले रूप आहे ! मार्क्सवादात ईश्वरी अधिष्ठानाला अजिबात स्थान नाही. त्यामुळेच महारावांनी अशी मुक्ताफळे उधळली आहेत ! गणेशमूर्ती गणेश भक्तांकडून हिसकावून घेऊन कचरागाडीत कोंबणे हे मार्क्सवादी विचार असलेल्या शहरी नक्षलवाद्यांची कुकृत्ये आहेत. तथाकथित पुरोगाम्यांची खरी भूमिका सुद्धा या शहरी नक्षलवादाला साहाय्यक आहे, हे अनेक घटनांतून दिसून आले आहे.

**- श्रीमती संध्या काटदरे, माणगाव**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२७ सप्टेंबर**

**१८९९ :-** सामाजिक, ऐतिहासिक आणि स्वातंत्र्याच्या इतिहासावर कादंबरी लेखन करणारे विठ्ठल वामन हडप यांचा जन्म. 'झाकली मूठ' ही त्यांची पहिली कादंबरी. ऐतिहासिक कादंबरीकार म्हणून ते गाजले यात 'कादंबरीमय पेशवाई' ही १३ कादंबऱ्यांची माला तसेच साम्यवादी विचारसरणीवर उगवत्या सूर्याचा काळोख, अन्नदाता उपाशी' हया कादंबऱ्या. 'काँग्रेसचा महावृक्ष' हे गांधीवादावर बेतलेले पुस्तक. 'नंदनवन', 'वैकुंठाचा राणा', 'मोपासाच्या आणि इतर गोष्टी' हे कथासंग्रह तसेच म. गांधीजीच्या अहिंसावादी राजकारणावर 'सं. देवकी' हे नाटक. 'चिरंजीवी' ही पौराणिक कादंबरी आणि काही चरित्रे अशी विपूल साहित्य संपदा त्यांच्या नावावर आहे. **१९०७:-** नाटककार, वृत्तपत्रकार, लघुकथाकार सुंदरराव भुजंगराव मानकर यांचा जन्म. 'काचेचे घर', 'न्याय', 'दारुबंदी', 'नवे जग' ही नाटके त्यांनी लिहिली. 'परत या' ही त्यांची कौटुंबिक एकांकिका. त्यांच्या स्वतंत्र विनोदबुद्धींची चुणूक दाखवणारी आहे. विविध नियतकालिकांतून लेख व लघुकथा त्यांच्या प्रसिध्द झाल्या आहेत. लेखक, उद्योजक, पेशाने चार्टर्ड अकौंटंट वामन हरी देशपांडे यांचा जन्म. 'आलापिनी' ही गायकांची व्यक्तिचित्रे, घरंदाजी गायकी' या ग्रंथातून संगीतातल्या घराण्यांचा शास्त्रोक्त विचार याशिवाय 'महाराष्ट्राचे संगीतातील कार्य' हा त्यांचा अनुवादीत ग्रंथ अशी साहित्य संपदा. **१९२९:-** निबंधकार, वृत्तपत्रकार, लेखक आणि काळकर्ते शिवराम महादेव परांजपे यांचे निधन. 'विष्णुसहस्त्रनाम' या लेखात भक्तीच्या प्रांतात बुध्दिवादाला जागा नसते या पाच शब्दांसाठी २७ ओळींचे काव्य रचले. त्यांचे साहित्यविषयक निवडक लेख 'साहित्य संग्रहा' च्या तीन भागांत संग्रहित केलेत. याशिवाय 'एका खडी फोडणाऱ्यांची गोष्ट', 'आम्रवृक्ष', 'एक कारखाना' या कथा, तर 'गोविंदाची गोष्ट', 'विंध्याचल' या कादंबऱ्या तसेच ९नाटके, काव्य मिळून त्यांची वीस पुस्तके प्रकाशित. **१९३५ : -** पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरु, मॉर्डन कॉलेजचे प्राचार्य राज्यशास्त्राचे अभ्यासक डॉ. शं. ना. नवलगुंदकर यांचा जन्म. स्वा. सावरकर 'राजकीय व सामाजिक विचार' यावर डॉक्टरेट मिळवणाऱ्या शं. ना. नी ज्युनियर ते सिनियर कॉलेजच्या राज्यशास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी २० हून अधिक पुस्तके लिहिलीत. 'लोकसत्तेतील स्मृति तरंग' आणि लोकमत मधील 'विचार वैभव' हे त्यांचे लोकप्रिय सदर. याशिवाय 'आनंद तरंग भाग १ ते ३ हा लेखसंग्रहही त्यांचा लोकप्रिय झाला. **१९४४ :-** कवी प्रा. डॉ. नीलकांत चिरकुटराव चव्हाण यांचा जन्म. ह्यांची 'निखारा युद्ध', 'वळ' हे काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहे. **१९३५ : -** पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरु, मॉर्डन कॉलेजचे प्राचार्य राज्यशास्त्राचे अभ्यासक डॉ. शं. ना. नवलगुंदकर यांचा जन्म. 'स्वा. सावरकर राजकीय व सामाजिक विचार' यावर डॉक्टरेट मिळवणाऱ्या शं. ना. नी ज्युनियर ते सिनियर कॉलेजच्या राज्यशास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी २० हून अधिक पुस्तके लिहिलीत. लोकसत्तेतील 'स्मृति तरंग' आणि लोकमत मधील 'विचार वैभव' हे त्यांचे लोकप्रिय सदर. याशिवाय 'आनंद तरंग भाग १ ते ३' हा लेखसंग्रहही त्यांचा लोकप्रिय झाला. **१९४४ :-** लेखिका नीता प्रभाकरराव पुल्लीवार यांचा जन्म. यांचा 'कृष्णा' हा भावगीतसंग्रह आणि 'वनस्पतींची विधानसभा' ही एकांकिका प्रसिध्द झाली आहे. **१९५७ :-** लेखिका उषा परब यांचा जन्म. लेखक प्रा. डॉ. ज्योतिराम कृष्णराव पवार यांचा जन्म. त्यांच्या ग्रंथसंपदेत 'क्रांतिसिंह नाना पाटील स्मृतिग्रंथ (संपादन सहाय्य)', 'प्रस्तावनाकार यशवंतराव चव्हाण', 'ज्ञानदीप', 'बालकामगारः प्रश्न तुमचा आमचा', 'गर्जा महाराष्ट्र अपुला', 'मुलांचे यशवंतराव चव्हाण', 'चिंतन', 'कामगारविश्व', 'चैतन्य', 'पत्र पावलेली आणि भावलेली', 'गोष्टीरुप कर्मवीर भाऊराव पाटील', 'दलितमित्र तांबटकाका स्मृतिग्रंथ', 'वसंतधन', 'उद्योजकतेतील नव रत्ने', 'भारत- वय वर्षे ६०', 'अर्थायन' अशी साहित्यसंपदा. **१९८७ :-** कथा-कादंबरीकार डॉ. भीमराव बळवंत कुलकर्णी यांचे निधन. डॉ. कुलकर्णी यांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे संपादकपद भुषवले असून त्यांनी अच्युत बळवंत कोल्हटकर: वाङ्मय दर्शन, अस्मिता महाराष्ट्राची, अक्षर चिंतामणी' हे संपादन तसेच इतिहासातील 'स्वामीनिष्ठाच्या कथा, ऐतिहासिक मराठी नाटके, 'ज्योत्याची केसरकर' ही ऐतिहासिक लिहिली. कथा, साहित्यिकांची व्यक्तिचित्रे, 'मस्तानीचा मुलगा' ही कादंबरी, सभेत कसे बोलावे अशी विविध विषयावर पुस्तके.

**- संजय वझरेकर**

**९७५५७६६७५**

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १०, अंक १२९(२)] शुक्रवार, सप्टेंबर १३, २०२४/भाद्रपद २२, शके १९४६ [पृष्ठे १४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३४७**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ सप्टेंबर २०२४

**शुद्धिपत्र**

**महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१.**

क्रमांक आयडीसी. २०१९/प्र.क्र.४५५/उद्योग १४.—ज्याअर्थी, अनुसुचित उल्लेखिलेल्या क्षेत्रात महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे प्रकरण सहा, जे अधिसूचना क्रमांक आयडीसी, २०१९/प्र.क्र.४५५/ उद्योग-१४, दिनांक ११ सप्टेंबर २०१९ अन्वये महाराष्ट्र शासनाने सदर अधिसूचनेच्या अनुसूचित उल्लेखिलेल्या क्षेत्रात महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. तीन) (यापुढे ज्याचा उल्लेख उक्त क्षेत्र असा करण्यात येईल) चे कलम सहा, दिनांक १२-१८ सप्टेंबर, २०१९ रोजी अंमलात आणले होते व उक्त अधिनियमाच्या आधारे उक्त अनुसूचित नमूद केलेले क्षेत्र अधिनियमाच्या कलम २, खंड (ग) अन्वये औद्योगिक क्षेत्र म्हणून जाहीर केलेले आहे; व महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ३२ (१) चा वापर करून जे सूचना क्रमांक आयडीसी, २०१९/प्र.क्र. ४५५/ उद्योग-१४, दिनांक १३ एप्रिल २०२३ अन्वये महाराष्ट्र शासनाने सदर सूचनेच्या अनुसूचित उल्लेखिलेल्या क्षेत्रात महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ३२(१), दिनांक १३ एप्रिल २०२३ रोजी अंमलात आणले होते.

आणि जर, मौजे शहापूर, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड मधील औद्योगिक क्षेत्रातील, सदर परिशिष्टात नमुद केलेल्या जमिनीच्या क्षेत्रफळामध्ये व प्रत्यक्ष संयुक्त मोजणीनंतर (महसुली अभिलेख नमुना क्रमांक ७ व १२) व संपादनासाठी निश्चित केलेल्या क्षेत्रफळ व गटाच्या हिश्यामध्ये तफावत असल्याचे महाराष्ट्र शासनाच्या निदर्शनास आणले गेले, व ज्यामुळे सदर कलम ३२(१) सुचनेत दुरुस्ती होणे महाराष्ट्र शासनास गरजेचे वाटत असेल;

तर, महाराष्ट्र सामान्य कलमे कायदा, १९०४ च्या कलम २१ सोबत वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमाच्या कलम १, उप कलम ३ आणि कलम २ चे उप कलम (ग) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांतर्गत महाराष्ट्र शासन असे जाहीर करते की, दिनांक १३ सप्टेंबर २०२४ पासून सदर अधिसूचनेत खालीलप्रमाणे बदल लागु झाले आहेत असे मानण्यात येईल.

**परिशिष्ट**

मौजे शहापूर, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड याबाबतच्या नोंदीबाबत

अ) पृष्ठ क्रमांक ६ वरील नोंदी मध्ये

| अ.क्र. | ऐवजी | | | वाचावे | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर) | गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर) |
| १ | २३७ | पै | ०.८२८० | २३७ | १ पै | ०.१२८० |
| | | | | २३७ | २ पै | ०.१९२० |
| | | | | २३७ | ३ पै | ०.४०८० |
| २ | २३९ | पै | ०.६५१० | २३९ | २ पै | ०.०३३० |
| ३ | २४० | पै | ०.६२९ | २४० | २ पै | ०.४६५५ |
| | | | | २४० | ४ पै | ०.०५४५ |
| ४ | २४१ | पै | ०.२८२० | २४१ | ४ पै | ०.२१२० |
| | | | | २४१ | ५ पै | ०.०२७० |
| ५ | २४६ | पै | ०.२६७० | २४६ | १ पै | ०.२४१० |
| ६ | २४९ | पै | ०.७३५० | २४९ | १ पै | ०.३४१० |
| | | | | २४९ | ३ पै | ०.००७५ |
| | | | | २४९ | ४ पै | ०.२९७० |
| ७ | २५० | पै | ०.५१८० | २५० | पै | ०.४५९० |
| ८ | २५१ | पै | ०.२८६० | २५१ | १ पै | ०.२१४५ |
| | | | | २५१ | २ पै | ०.०२१० |
| | | | | २५१ | ३ पै | ०.२३४० |
| ९ | २५३ | पै | ०.२११० | २५३ | २ पै | ०.०२४० |
| | | | | २५३ | ३ पै | ०.०७१० |
| १० | २७१ | पै | ०.४४९० | २७१ | ५ पै | ०.२४२५ |
| | | | | २७१ | ६ पै | ०.२३२० |
| ११ | २७२ | पै | ०.४४९० | २७२ | ३ पै | ०.२५८५ |
| | | | | २७२ | ४ पै | ०.०६६० |
| | | | | २७२ | ५ पै | ०.०२३० |
| | | | | २७२ | ६ पै | ०.०६६० |
| १२ | २७८ | पै | ०.५१८० | २७८ | १ पै | ०.२०१० |
| | | | | २७८ | २ पै | ०.०९५० |
| | | | | २७८ | ३ पै | ०.०४२५ |
| | | | | २७८ | ४ पै | ०.०५५५ |
| | | | | २७८ | ५ पै | ०.०७१० |
| १३ | २७९ | पै | ०.३७३० | २७९ | १ पै | ०.०४५० |
| | | | | २७९ | २ पै | ०.०५०० |
| | | | | २७९ | ३ पै | ०.३४६० |
| १४ | २८२ | पै | ०.७०४० | २८२ | १ पै | ०.१३९० |
| | | | | २८२ | २ पै | ०.१७८० |
| | | | | २८२ | ३ पै | ०.११९१ |
| | | | | २८२ | ४ पै | ०.१७३५ |

ब) पृष्ठ क्रमांक ८ वरील नोंदी मध्ये

| अ.क्र. | ऐवजी | | | वाचावे | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर) | गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर) |
| १५ | २८३ | पै | ०.८०९० | २८३ | १ पै | ०.१०७० |
| | | | | २८३ | २ पै | ०.०४४० |
| | | | | २८३ | ४ पै | ०.३६४० |
| | | | | २८३ | ५ पै | ०.२००० |
| १६ | ४१४ | पै | ०.१६२० | ४१४ | २ पै | ०.०२१० |
| | | | | ४१४ | ३ पै | ०.०८४५ |
| १७ | ४१५ | पै | ०.५३४० | ४१५ | १ पै | ०.४३९० |
| | | | | ४१५ | ४ पै | ०.००८० |
| | | | | ४१५ | ५ पै | ०.०२३० |
| १८ | ४१६ | पै | ०.५३९० | ४१६ | १ पै | ०.४४९० |
| | | | | ४१६ | २ पै | ०.०२७० |
| १९ | ४१७ | पै | १.००२० | ४१७ | १ पै | ०.१७०० |
| | | | | ४१७ | २ पै | ०.३८३० |
| | | | | ४१७ | ३ पै | ०.०१३० |
| | | | | ४१७ | ४ पै | ०.१५१५ |
| | | | | ४१७ | ५ पै | ०.३०५० |
| २० | ४१८ | पै | ०.१७९० | ४१८ | १ पै | ०.०२१० |
| | | | | ४१८ | २ पै | ०.१२७० |
| २१ | ४२६ | पै | ०.३१७० | ४२६ | १/१ पै | ०.१०४० |
| | | | | ४२६ | १/२ पै | ०.१६९० |

| अ.क्र. | ऐवजी | | | वाचावे | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर) | गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर) |
| २२ | ४२८ | पै | ०.४८७० | ४२८ | १ पै | ०.०५३० |
| | | | | ४२८ | २/१ पै | ०.२७६० |
| | | | | ४२८ | २/२ पै | ०.१११० |
| | | | | ४२८ | ३ पै | ०.०७३० |
| | | | | ४२८ | ४/१ पै | ०.०९४० |
| २३ | ४२९ | पै | ०.४७०० | ४२९ | ४ पै | ०.१३९० |
| | | | | ४२९ | ५ पै | ०.३६१० |
| २४ | ४३१ | पै | ०.४८१० | ४३१ | ४ पै | ०.१३२५ |
| | | | | ४३१ | ५ पै | ०.३९१० |
| २५ | ४३२ | पै | ०.४५५० | ४३२ | १ पै | ०.२६८० |
| | | | | ४३२ | ३ पै | ०.१५१० |
| | | | | ४३२ | ४ पै | ०.०८९० |
| २६ | ४३३ | पै | ०.१८२० | ४३३ | ३ पै | ०.२५२५ |
| २७ | ४९५ | पै | ०.८३९ | ४९५ | ० पै | ०.७०८५ |
| २८ | ४९८ | पै | ०.६९९ | ४९८ | ३ पै | ०.६२२० |
| २९ | ४९९ | पै | ०.२०७० | ४९९ | १ पै | ०.०५५० |
| | | | | ४९९ | २ पै | ०.१८७० |
| ३० | ५०० | पै | ०.६६४० | ५०० | १ पै | ०.१०१० |
| | | | | ५०० | ३ पै | ०.०७८० |
| | | | | ५०० | ४ पै | ०.११९० |
| | | | | ५०० | ५ पै | ०.३३४० |
| ३१ | ५०३ | पै | १.०९३० | ५०३ | १ पै | ०.२४३० |
| | | | | ५०३ | २ पै | ०.०४३० |
| | | | | ५०३ | ३ पै | ०.६५५० |
| ३२ | ५०४ | पै | ०.४०६० | ५०४ | १ पै | ०.११२५ |
| | | | | ५०४ | २ पै | ०.२०६० |
| ३३ | ५१७ | पै | ०.१६९० | ५१७ | १ पै | ०.०७३० |
| | | | | ५१७ | २ पै | ०.००७५ |
| | | | | ५१७ | ४ पै | ०.०१६० |

(पान ६ वर)

(पान ५ वरुन)

| अ.क्र. | ऐवजी | | | वाचावे | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर) | गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर) |
| ३४ | ५१९ | पै | ०.५६०० | ५१९ | १ पै | ०.०९४० |
| | | | | ५१९ | २ पै | ०.३०७० |
| ३५ | ५२० | पै | ०.७९५० | ५२० | ० पै | ०.९७०० |
| ३६ | ५२३ | पै | ०.५७१० | ५२३ | १ पै | ०.०१९५ |
| ३७ | ५३० | पै | १.१६५० | ५३० | १ पै | ०.३५०० |
| | | | | ५३० | २ पै | ०.३३५३ |
| | | | | ५३० | ३ पै | ०.२०८५ |
| | | | | ५३० | ४ पै | ०.२६६० |
| ३८ | ५५० | पै | ०.६८७० | ५५० | १/१ पै | ०.४६०० |
| | | | | ५५० | १/२ पै | ०.१३७० |
| ३९ | ५५१ | पै | ०.७९९० | ५५१ | १ पै | ०.३५१५ |
| | | | | ५५१ | २ पै | ०.६१६० |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संजय देगांवकर,**
शासनाचे सहसचिव.

**INDUSTRIES, ENERGY, LABOUR & MINING DEPARTMENT**

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, Dated 12th September 2024

*CORRIGENDUM*

Maharashtra Industrial Development Act, 1961.

No. IDC. 2019/C.R. 455/IND -14.—Whereas, by the Government Notification, Industries, Energy and Labour Department, No. IDC. 2019/C.R. 455/IND-14, dated 11th September 2019 issued in exercise of the powers conferred by sub-section (*3*) of section 1 of the Maharashtra Industrial Development Act, 1961(Mah. III of 1962) (hereinafter referred to as "the said Act"), the Government of Maharashtra has appointed the 11-18th September 2019 to be the date from which the provisions of Chapter- VI of the said Act shall take effect in the areas mentioned in the Schedule appended to the said notification and declared those areas as an industrial area under clause (*g*) of section 2 of the said Act, and in exercise of Section 32(*1*) of the Maharashtra Industrial Development Act, 1961, Notice No. IDC. 2019/ C.R.455/IND-14, dated 13th April 2023 issued in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 32 of the said Act was enacted by the Government of Maharashtra on 13 April 2023 in the areas mentioned in this notice.

And Whereas, it is brought to the notice of the Government of Maharashtra that there is a difference in the measurements of certain areas of the said industrial area and in an areas confirmed for acquisition after actual joint measurement (revenue record in the forms VII and XII) of Village Shahapur in Alibaug Taluka of Raigad District, and the Government of Maharashtra considers it expedient to amend the sub-section (*1*) of section 32 notice so as to mention the correct areas with respect to the said industrial area in the said sub-section (*1*) of section 32 notice.

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub- section (*3*) of section 1 and clause (*g*) of section 2 of the said Act read with section 21 of the Maharashtra General Clauses Act (I of 1904), and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby, with effect from the 13th September 2024 amends the said notification, as follows namely :-

**In the Schedule appended to the said notification,**

**in entry relating to village Shahapur, Taluka Alibaug, District Raigad:-**

A) On Page No. 8

| Sr. No | Instead of | | | Read as | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | Gat No | Hissa No. | Area in (H.R.) | Gat No | Hissa No. | Area in (H.R.) |
| 1 | 237 | Pt | 0.8280 | 237 | 1 Pt | 0.1280 |
| | | | | 237 | 2 Pt | 0.1920 |
| | | | | 237 | 3 Pt | 0.4080 |
| 2 | 239 | Pt | 0.6510 | 239 | 2 Pt | 0.0330 |
| 3 | 240 | Pt | 0.629 | 240 | 2 Pt | 0.4655 |
| | | | | 240 | 4 Pt | 0.0545 |
| 4 | 241 | Pt | 0.2820 | 241 | 4 Pt | 0.2120 |
| | | | | 241 | 5 Pt | 0.0270 |
| 5 | 246 | Pt | 0.2670 | 246 | 1 Pt | 0.2410 |
| 6 | 249 | Pt | 0.7350 | 249 | 1 Pt | 0.3410 |
| | | | | 249 | 3 Pt | 0.0075 |
| | | | | 249 | 4 Pt | 0.2970 |
| 7 | 250 | Pt | 0.5180 | 250 | Pt | 0.4590 |
| 8 | 251 | Pt | 0.2860 | 251 | 1 Pt | 0.2145 |
| | | | | 251 | 2 Pt | 0.0210 |
| | | | | 251 | 3 Pt | 0.2340 |
| 9 | 253 | Pt | 0.2110 | 253 | 2 Pt | 0.0240 |
| | | | | 253 | 3 Pt | 0.0710 |
| 10 | 271 | Pt | 0.4490 | 271 | 5 Pt | 0.2425 |
| | | | | 271 | 6 Pt | 0.2320 |
| 11 | 272 | Pt | 0.4490 | 272 | 3 Pt | 0.2585 |
| | | | | 272 | 4 Pt | 0.0660 |
| | | | | 272 | 5 Pt | 0.0230 |
| | | | | 272 | 6 Pt | 0.0660 |
| 12 | 278 | Pt | 0.5180 | 278 | 1 Pt | 0.2010 |
| | | | | 278 | 2 Pt | 0.0950 |
| | | | | 278 | 3 Pt | 0.0425 |
| | | | | 278 | 4 पै | 0.0555 |
| | | | | 278 | 5 Pt | 0.0710 |
| 13 | 279 | Pt | 0.3730 | 279 | 1 Pt | 0.0450 |
| | | | | 279 | 2 Pt | 0.0500 |
| | | | | 279 | 3 Pt | 0.3460 |
| 14 | 282 | Pt | 0.7040 | 282 | 1 Pt | 0.1390 |
| | | | | 282 | 2 Pt | 0.1780 |
| | | | | 282 | 3 Pt | 0.1191 |
| | | | | 282 | 4 Pt | 0.1735 |
| 15 | 283 | Pt | 0.8090 | 283 | 1 Pt | 0.1070 |
| | | | | 283 | 2 Pt | 0.0440 |
| | | | | 283 | 4 Pt | 0.3640 |
| | | | | 283 | 5 Pt | 0.2000 |

B) On Page No.9

| Sr. No | Instead of | | | Read as | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | Gat No | Hissa No. | Area in (H.R.) | Gat No | Hissa No. | Area in (H.R.) |
| 16 | 414 | Pt | 0.1620 | 414 | 2 Pt | 0.0210 |
| | | | | 414 | 3 Pt | 0.0845 |
| 17 | 415 | Pt | 0.5340 | 415 | 1 Pt | 0.4390 |
| | | | | 415 | 4 Pt | 0.0080 |
| | | | | 415 | 5 Pt | 0.0230 |
| 18 | 416 | Pt | 0.5390 | 416 | 1 Pt | 0.4490 |
| | | | | 416 | 2 Pt | 0.0270 |
| 19 | 417 | Pt | 1.0020 | 417 | 1 Pt | 0.1700 |
| | | | | 417 | 2 Pt | 0.3830 |
| | | | | 417 | 3 Pt | 0.0130 |
| | | | | 417 | 4 Pt | 0.1515 |
| | | | | 417 | 5 Pt | 0.3050 |
| 20 | 418 | Pt | 0.1790 | 418 | 1 Pt | 0.0210 |
| | | | | 418 | 2 Pt | 0.1270 |
| 21 | 426 | Pt | 0.3170 | 426 | 1/1 Pt | 0.1040 |
| | | | | 426 | 1/2 Pt | 0.1690 |
| 22 | 428 | Pt | 0.4870 | 428 | 1 Pt | 0.0530 |
| | | | | 428 | 2/1 Pt | 0.2760 |
| | | | | 428 | 2/2 Pt | 0.1110 |
| | | | | 428 | 3 Pt | 0.0730 |
| | | | | 428 | 4/1 Pt | 0.0940 |

(पान ७ वर)

(पान ६ वरून)

| Sr. No | Instead of | | | Read as | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | Gat No | Hissa No. | Area in (H.R.) | Gat No | Hissa No. | Area in (H.R.) |
| 23 | 429 | Pt | 0.4700 | 429 | 4 Pt | 0.1390 |
| | | | | 429 | 5 Pt | 0.3610 |
| 24 | 431 | Pt | 0.4810 | 431 | 4 Pt | 0.1325 |
| | | | | 431 | 5 Pt | 0.3910 |
| 25 | 432 | Pt | 0.4550 | 432 | 1 Pt | 0.2680 |
| | | | | 432 | 3 Pt | 0.1510 |
| | | | | 432 | 4 Pt | 0.0890 |
| 26 | 433 | Pt | 0.1820 | 433 | 3 Pt | 0.2525 |
| 27 | 495 | Pt | 0.839 | 495 | 0 Pt | 0.7085 |
| 28 | 498 | Pt | 0.699 | 498 | 3 Pt | 0.6220 |
| 29 | 499 | Pt | 0.2070 | 499 | 1 Pt | 0.0550 |
| | | | | 499 | 2 Pt | 0.1870 |
| 30 | 500 | Pt | 0.6640 | 500 | 1 Pt | 0.1010 |
| | | | | 500 | 3 Pt | 0.0780 |
| | | | | 500 | 4 Pt | 0.1190 |
| | | | | 500 | 5 Pt | 0.3340 |
| 31 | 503 | Pt | 1.0930 | 503 | 1 Pt | 0.2430 |
| | | | | 503 | 2 Pt | 0.0430 |
| | | | | 503 | 3 Pt | 0.6550 |
| 32 | 504 | Pt | 0.4060 | 504 | 1 Pt | 0.1125 |
| | | | | 504 | 2 Pt | 0.2060 |
| 33 | 517 | Pt | 0.1690 | 517 | 1 Pt | 0.0730 |
| | | | | 517 | 2 Pt | 0.0075 |
| | | | | 517 | 4 Pt | 0.0160 |
| 34 | 519 | Pt | 0.5600 | 519 | 1 Pt | 0.0940 |
| | | | | 519 | 2 Pt | 0.3070 |
| 35 | 520 | Pt | 0.7950 | 520 | 0 Pt | 0.9700 |
| 36 | 523 | Pt | 0.5710 | 523 | 1 Pt | 0.0195 |
| 37 | 530 | Pt | 1.1650 | 530 | 1 Pt | 0.3500 |
| | | | | 530 | 2 Pt | 0.3353 |
| | | | | 530 | 3 Pt | 0.2085 |
| | | | | 530 | 4 Pt | 0.2660 |
| 38 | 550 | Pt | 0.6870 | 550 | 1/1 Pt | 0.4600 |
| | | | | 550 | 1/2 Pt | 0.1370 |
| 39 | 551 | Pt | 0.7990 | 551 | 1 Pt | 0.3515 |
| | | | | 551 | 2 Pt | 0.6160 |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANJAY DEGAONKAR,
Joint Secretary to Government

**जिमाका /राअ/जाहिरात/१०२/२०२४-२५**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे नागाव, ता. अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीच्या विद्यमान मालक शिरीष वसंत चव्हाण, यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| नागाव, ता. अलिबाग, | ४७ | ०-३९-०० | ७.३८ |

एकुण क्षेत्रापैकी विद्यमान मालकांचे यांचे मालकीचे बागायत क्षेत्र ०-०५-२१ हे.आर.या नोटीसीचा विषय आहे.

सदरहू वर्णन केलेली मिळकत निर्वेध, बोजा रहीत असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापि सदर मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा, वारसाहक्क, मालकी, एम.ओ.यू. करार, ताबेकब्जा वहीवाट, रस्ता वहीवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडून दिला आहे असे समजून, गृहीत धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. २०/०९/२०२४
मोबा. ९९२२७९८५२८

**ॲड. राहुल रमेश नाईक**
मु. चिंचपागल्ली, पो. नागाव
ता. अलिबाग, जि. रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे आशिल अनिल दत्तात्रय कडव, रा. भानसोली, चिंचवली, ता. कर्जत, जि. रायगड यांनी खालील वर्णनाच्या जमीन मिळकतीचे जमीन मालक श्री. ॲशली ॲगी बरोज रा. फ्लाट नं. ३१ बी, पाली रोड नं.२, वकमेन हाउस, सेंट पीटर कॉलनी बांद्रा. मुंबई यांच्याकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे धोत्रे, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकतीचे वर्णन**

| स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै |
|---|---|---|---|
| ७९ | २ | ०-२६-३० पो.ख ००-०१-६० एकुण क्षेत्र ०-२७-९० | १-३२ |
| ३ | ६ | ०-४७-०० पो.ख ००-०३-०० एकुण क्षेत्र ०-५०-०० | ०-३४ |

सबब सदर मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही, गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज, तबदील, ट्रस्ट, कुळअखत्यारपत्र, बयाना पावती हक्क हितसंबंध असल्यास संबंधितांनी आपआपल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार यांचेकडे अगर खालील नमूद केलेल्या पत्त्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यांसहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात अथवा प्रत्यक्ष भेट घ्यावी. याप्रमाणे कोणाचीही वरील मुदतीत तक्रार आली नाही. तर सदर मिळकत ही निर्वेध, बोजारहीत व खरेदी घेण्यास योग्य आहे असे समजून सर्व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती व तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत असे समजून पुढील खरेदीचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

दि. २५/०९/२०२४

सही/-
**(ॲड.विलास दौलत ऐनकर)**
बी.ए.एल.एल.बी
मु.पो.खांडस, ता.कर्जत, जि.रायगड
मोबाईल नं. ९८८१२९८३३८/९५७९८८०१९८

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड)

ज.म.र अर्ज ११/२०२४

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्री. आशिष हरिश्चंद्र पाटील — अर्जदार
रा. कळंबोली
विरुध्द
ग्रुप ग्रामपंचायत शहाबाज, — सामनेवाला
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार हे मौजे कळंबोली, रायगड येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांचे आजोबा कै. तुळज्या गणू पाटील यांना मृत्यु दि २६/११/१९५४ रोजी घसवड येथील राहत्या घरी झाला होता.

२. मात्र त्यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत शहाबाज येथे केलेली नसल्याने त्यांचा मृत्यु दाखला मिळण्यासाठी मृत्यू नोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत शहाबाज यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि.२०/१०/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि.२०/०९/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.

ठिकाण : अलिबाग
तारिख : २०/०९/२०२४

सही/-
**(विक्रम पाटील)**
तहसिलदार अलिबाग

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, मौजे-चेंढरे तालुका अलिबाग जिल्हा रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत व त्या मिळकतीचे मालक/कब्जेदार याचे बरोबर आमचे अशील मे. पितृछाया ग्रुप तर्फे भागीदार श्री अभिजित सुरेश पाटील यांनी सदरची मिळकत विकसित करण्याचा लेखी करार केलेला आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| अ. क्र. | मौजे | भूमापन क्रमांक स.न/ग.स. | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|---|
| १. | चेंढरे, ता.अलिबाग जि.रायगड | ३७ | १अ/२ | क्षेत्र ०-२३-८ पो. ख. ०-०४-२ एकुण क्षेत्र ०-२८-० | ५.९० |
| २ | चेंढरे, ता. अलिबाग जि.रायगड | ३७ | १अ/३ | क्षेत्र ०-१४-२ पो. ख. ०-०३-२ एकूण क्षेत्र ०-१७-४ | ३.७८ |

**टीप - पैकी दिपक गोपीनाथ पाष्टे, विजया गोपीनाथ पाष्टे, सागर दिपक पाष्टे, आरती अरुण वाकडे, यांच्या मालकी हक्कात ताबेकब्जा वहिवाटीत असलेले २० गुंठे क्षेत्र तसेच १७.०४ गुंठे क्षेत्र हे या नोटीशीचा विषय आहे.**

वर नमुद केलेल्या मिळकतीचे वर नमूद असलेल्या मालकांसोबत आमचे अशिलांनी लेखी स्वरुपात मिळकत विकसित करण्याचा करार केलेला असून त्यापोटी वेळोवेळी आर्थिक मोबदला देखील वरील नमूद मिळकतीच्या मालकांनी तो आमचे अशिलांकडुन स्विकारलेला आहे. आमचे अशिल सदर करारानुसार वरील नमूद मिळकतीवर करारात नमूद केलेल्या अटीशर्तीच्या नुसार प्रत्यक्ष कामास लवकरच सुरुवात करण्याच्या विचारात आहेत. त्यामुळे वर नमूद केलेल्या मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, गहाण, दान, बक्षिस, लिज, वहिवाट, वारसा, इजमेन्ट, अदलाबदल, भाडेकरार, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्ट जप्ती, करारमदार, दावा खरेदीखत, साठेकरार, अखत्यारपत्र, अगर कुठल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध अगर अधिकार असल्यास अशा व्यक्तीने आपला हक्क लेखी कायदेशीर पुराव्यासहित ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर सर्व संबंधित कायदेशीर कागदोपत्री पुरावा घेवुन खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदर वरील नमुद मिळकत ही पुर्णपणे निर्वेध निर्जोखमीची आहे असे समजून अथवा कोणाचाही हक्क अगर हिसंबंध असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे असे समजून आमचे अशिल वरील नमुद मिळकतीवर मिळकत विकसित करण्याच्या केलेल्या लिखित करार नाम्यातील नमुद केल्याप्रमाणे कामकाज सुरु करतील मात्र त्यानंतर मागाहून कुणाचीही कसलीही तक्रार आल्यास आमच्या अशिलांवर ती बंधनकारक राहाणार नाही हे तमाम जनतेस कळावे.

अलिबाग
दिनांक : २६/०९/२०२४

सही/-
**ॲड. सचिन दिनकर पाटील**
बी.ए.एल.एल.बी.(मुंबई)
२१, पारिजात सोसायटी, चेंढरे,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो. नं. ९२२६८७२६९०

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, विद्यमान जमिन मालक श्री. सुरेश बबनराव सोनावणे (भगत) यांचे ताबेकब्जातील व वहीवाटीतील त्यांचे कायदेशीर मालकी हक्कातील व हिश्श्यातील खालील परिशिष्ठामध्ये वर्णन केलेली जमिन आमचे अशिलांनी त्यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार ठरविला आहे.सदरहू जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मौजे अरवंद, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन**

| भूमापन क्र. | उपविभाग क्र | क्षेत्र | | | आकारणी रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| | | लागवड योग्य हे.आर.चौ.मी | पोट खराबा हे.आर.चौ.मी | एकुण हे. आर.चौमी | |
| १४ | ३४/ब | ०.०८.०० | ०.००.०० | ०.०८.०० | ०.१० |

वरील वर्णनाच्या जमिनीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहिवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने, कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहित सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमिन निर्वेध व बोजारहीत आहे असे समजणेत येवून सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पूर्ण केला जाईल व मूदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशीलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दिनांक : २६/०९/२०२४

**ॲड. मोनाली रामदास हजारे**
एम. कॉम. एल.एल.बी,
रजि.नं.MAH /६१४५/२०२४
पत्ता - नॅच्युरा वन, ग्राउंड फ्लोअर,
सदनिका क्र. ००४, इको ग्रीन, डिमार्ट
जवळ, ता. कर्जत, जि. रायगड
मो. नं. ९२६०१०९२८२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

खालील वर्णनाच्या जमीन मिळकतीचे विद्यमान मालक श्री. योगेश गणेश ठाकुर व प्रकाश गणेश ठाकूर रा. सावरोली, यांचेकडून सदर खालील वर्णनाची जमीन मिळकत आमचे अशिलांनी कायम स्वरूपी खरेदी-विक्री घेण्याचे ठरविले आहे.

**गाव सावरोली येथील मिळकतीचे वर्णन :-**

| गाव | गट क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र हे.आर | आकारणी रू.पै | लागवड |
|---|---|---|---|---|
| सावरोली | ९/१/ड | ०.०५.८० | १.१९ | भात |
| सावरोली | ३/६ | ०.३०.६० | ५.१२ | भात |

वरील नमुद मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा करून घेण्याकरीता सदरची नोटीस देण्यात येत आहे. तरी देखील या मिळकतीमध्ये इतर कोणाचेही गहाण दान, लिज, फरोक्त, भागीदार, बक्षिस, मृत्यूपत्रांकित दान, ताबेकब्जा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी, हक्क, लिन, इजमेंटरी हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास तसेच या मिळकतीबाबात कोणत्याही ठिकाणी वाद तंटे चालु असल्यास अथवा या व्यवहाराला कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी आपली हरकत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत लेखी स्वरूपात पुराव्यासह दाखल करावी व त्याची पोच घ्यावी. या मुदतीमध्ये कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून आमचे अशिल खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या हरकतीचे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. कागदोपत्री पुरावा न जोडलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २६/०९/२०२४

सही/-
**ॲड. सचिन दत्तात्रेय पाटील**
मु. येसदे, पो. वळके, ता. मुरूड, जि. रायगड.

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड)

ज.म.र अर्ज ०६/२०२४

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्रीम. मोरेश्वर वासुदेव कोळी
रा. बोडणी, पो. सारळ — अर्जदार
ता. अलिबाग, जि. रायगड
विरुद्ध
ग्रुप ग्रामपंचायत रेवस, — सामनेवाला
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार हे मौजे रेवस, ता. अलिबाग, जि. रायगड येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांचे आजोबा, कै. मारूती कृष्णा कोळी यांचा मृत्यु दि. १५/०६/१९९८ रोजी मौजे रेवस येथील राहत्या घरी झाला होता.

२. मात्र त्यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत रेवस येथे केलेली नसल्याने त्यांचा मृत्यु दाखला मिळण्यासाठी मृत्यू नोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत रेवस यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि.२०/१०/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि.२०/०९/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.

ठिकाण : अलिबाग
तारिख : २०/०९/२०२४

सही/-
**(विक्रम पाटील)**
तहसिलदार अलिबाग

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड)

ज.म.र अर्ज १२/२०२४

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्री. आशिष हरिश्चंद्र पाटील
रा. कळंबोली — अर्जदार
विरुध्द
ग्रुप ग्रामपंचायत शहाबाज,
ता. अलिबाग, जि. रायगड — सामनेवाला

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार हे मौजे कळंबोली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांचे पणजोबा कै. गणू महादू पाटील यांना मृत्यु दि १४/०९/१९३६ रोजी घसवड येथील राहत्या घरी झाला होता.

२. मात्र त्यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत शहाबाज येथे केलेली नसल्याने त्यांचा मृत्यु दाखला मिळण्यासाठी मृत्यू नोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत शहाबाज यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन दि. २०/१०/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि. २०/०९/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.

ठिकाण : अलिबाग
तारिख : २०/०९/२०२४

सही/-
**(विक्रम पाटील)**
तहसिलदार अलिबाग

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड)

ज.म. र अर्ज १९/२०२४

जाहिर नोटीस

प्रति,
श्री. पुजा संजय मांडवकर
वय ४० वर्षे, धंदा गृहिणी — अर्जदार
रा. मु.पो. किहिम
ता. अलिबाग, जि. रायगड
विरुध्द
ग्रुप ग्रामपंचायत किहिम, — सामनेवाला
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार हे मौजे किहिम, ता. अलिबाग, जि. रायगड येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांचे वडील कै. कृष्णा सदाशिव जोशी यांना मृत्यु दि. २२/०३/१९८६ रोजी किहिम येथील राहत्या घरी झाला होता.

२. मात्र त्यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत किहिम येथे केलेली नसल्याने त्यांचा मृत्यु दाखला मिळण्यासाठी मृत्यू नोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत किहिम यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासनू दि.२०/१०/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि.२०/०९/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.

ठिकाण : अलिबाग
तारिख : २०/०९/२०२४

सही/-
**(विक्रम पाटील)**
तहसिलदार अलिबाग

## जाहीर नोटीस

गौरवनगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित या जाहीर नोटीशीने सर्वांना कळविण्यात येत आहे की, गौरवनगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित नागडोंगरी-चेंढरे ता. अलिबाग, जि. रायगड ही नोंदणीकृत सहकारी संस्था असून तिचा नोंदणी क्र. आर.जी.डी./अे.बी.जी./एच.एस.जी/(टी.सी.) ३७५/१९९७-९८ असा आहे. उपरोक्त संस्थेच्या नावे व कब्जात असलेल्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे.

| गाव/शहर | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र आर.चौ. मीटर | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| गाव चेंढरे ता. अलिबाग | २/३ | ३७-६०-०० | ३७६ |

सदर मिळकतीवर आज रोजी गौरवनगर सहकारी गृहनिर्माण संस्था म. अस्तित्वात आहे. या इमारतीमध्ये ३९ सदनिका व ०८ दुकान गाळे आहेत.

सदरची इमारत आता जुनी झाली असून तिचा पुनर्विकास करणेचा आहे. तरी उपरोक्त पुर्नविकास करणे कामी आर्थिक आणि तांत्रिक दृष्टीने सबळ असणाऱ्या व अशा बांधकामाचा पुर्वानुभव असणाऱ्या विकासकामापासून सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांत देकार मागविण्यात येत आहेत. संबंधित कागदपत्रे व इतर तपशील बघण्याकरीता सुट्टीचे दिवस वगळता आमच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. कोणताही देकार स्विकारण्याचे वा नाकारण्याचे अधिकार गौरवनगर सहकारी गृहनिर्माण संस्था म. चेंढरे व्यवस्थापन समिती राखून ठेवत आहे.

**आर्किटेक्ट श्री. कुलदिप हजारे**
स्टुडिओ ११२, श्री यश प्लाझा, पहिला मजला
एल.आय.सी. ऑफिसजवळ, पेण, ता. पेण, जि. रायगड

# पारंपरिक मच्छिमार चिंतेत

## मत्स्यदुष्काळामुळे आर्थिक फटका; सरकारच्या धोरणामुळे मोठ्या संकटात

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

**हवामान बदलाचा फटका मच्छिमारांना बसत असून, हंगाम वाया गेल्यामुळे मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. गेल्या काही वर्षांपासून सातत्याने अशी परिस्थिती मच्छिमारांवर ओढावत असल्याने कोळी बांधव चिंतत आहेत. एकीकडे निसर्गाची अवकृपा, तर दुसरीकडे मासेमारीस गेल्यावर मत्स्यविभाग, कस्टम, नेव्ही, कोस्ट गार्ड यांनी घातलेले सीमांकनाचे बंधन यामुळे मच्छिमार चारही बाजूने संकटात सापडला असून, त्याचा परिणाम कोळी बांधवांच्या जीवनमानावर होत असल्याची माहिती महाराष्ट्र मच्छिमार संघ मुंबई-संचालक तथा रायगड जिल्हा मच्छिमार संघाचे व्हाईस चेअरमन मनोहर बैले यांनी दिली.**

ते म्हणाले की, एकेकाळी समुद्रात मुबलक मिळणारी मत्स्यसंपदा आणि तिच्यावर उपजीविका करणारे पारंपरिक मच्छिमार गेल्या लॉकडाऊनपासून संकटात सापडले आहेत. हजारो पारंपरिक मच्छिमारांना सध्या मत्स्यदुष्काळजन्य परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे. बेकादेशीर पर्ससीन, एलईडी मासेमारी करणारे त्यात हायस्पीड ट्रॉलर्समुळेही पारंपरिक मच्छिममारांच्या व्यवसायावर परिणाम होत आहे. यामुळे किनारपट्टीचा आर्थिक कणा असलेला मत्स्यव्यवसाय सध्या अडचणीत सापडला असून, कमकुवत होताना दिसून येत आहे. पारंपरिक मच्छिमारांना टिकण्यासाठी शासनाने विशेष पॅकेजची तरतूद करणे आवश्यक आहे. तरच ते आपल्या जीवनात तग धरु शकतील.

(छायाचित्र : गणेश चोडणेकर)



जिल्ह्यात २२२७ तांत्रिक बोटी असून, प्रत्येक बोटी वेगवेगळ्या परीने मासेमारी करीत असतात. मुरुड तालुक्यात ९० टक्के बोटी दालदी (गीलनेट) या पद्धतीने मासेमारी करीत असून, एका बोटीवर १० ते १२ खलाशी काम करत असल्याची माहिती बैले यांनी दिली. ते म्हणाले की, मासेमारीकरिता गेलेल्या बोटी आठ ते दहा दिवसांनी मासे घेऊन किनारी येत असतात.प्रत्येक फेरीला ५० ते ६० हजार रूपये खर्च येतो. दरम्यान, चांगले मासे मिळून दरही चांगला मिळाला तर खर्च सोडून ७० हजार रुपयांचा नेट फायदा मिळतो. कधी कधी त्यापेक्षा जास्त फायदा मिळतो. परंतु, कधी कधी मासळी मिळाली नाही, तर खर्च अंगावर पडतो. मत्स्य विभागाने १ ऑगस्टपासून गस्ती नौका तैनात करणे आवश्यक आहे. मात्र, गस्ती तैनात व्हायला ऑक्टोबर उजाडतो. मत्स्य विभागाने येथुन पुढे मत्स्य हंगाम विचारात घेऊन १ एप्रिल ते ३१ मार्च या आर्थिक वर्षासाठी गस्ती नौकेची तरतूद करावी. केंद्र सरकार व राज्य सरकारने मासेमारी कोळी बांधवांना विशेष पॅकेजची तरतूद करावी. बेकायदेशीर एलईडी पर्ससीन मासेमारीला आळा घालावा, राज्य शासनाने अनधिकृत मिनी पर्ससीन नेटव्दारे १० वावाच्या आत होणारी बेकायदा मासेमारी रोखावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

शासनाकडून मिळणारा डिझेलचा कोटा व्यवस्थित पध्दतीने मिळत नसल्यामुळे अडचणी ला सामोरे जावे लागत आहे. यासह डिझेलचा परतावाही शासनाकडून वेळेवर मिळत नाही. तो मिळवण्यासाठी अनेक महिन्यांचा कालावधी जात आहे. शासनाने अनेक निर्बंध लादल्यामुळे मच्छिमार अडचणीत सापडला आहे, अशी टीकाही बैले यांनी केली. नैसर्गिक आपत्तीमुळे मत्स्यदुष्काळ जाहीर करुन मच्छिमारांना भरपाई देण्यात यावी. पर्ससीन व एलइडी मासेमारी पद्धतीची विध्वंसकारी मासेमारी बंद करून त्यांची अंमलबजावणी करावी. मच्छिमार संस्थांचे मासेमारी सहकारी प्रकल्पाचे कर्ज माफ करण्यात यावे. नौकाधारकांचे परवाना नूतनीकरण व विमा कधीही मिळेल याकरिता तारखेची अट नसावी. जेणेकरुन मासेमारी नौका समुद्रात उतरण्यास विलंब होणार नाही. मासेमारी करणाऱ्या कोळी बांधवांना विश्वास न घेता काही ठिकाणी ओएनजीसी कंपनीने समुद्रात विहिरी खोदल्यामुळे त्याठिकाणी मासेमारी करता येत नाही. परंतु, मासे त्याच भागात मिळत असल्याने मासेमारी करणाऱ्या कोळी बांधवांना मोठी अडचण निर्माण झाली आहे, असेही मनोहर बैले यांनी सांगितले.



# ई-रिक्षाचा प्रवास होणार सुकर

## ■ रस्त्यांच्या दुरुस्तीला सुरुवात

**। माथेरान । वार्ताहर ।**

ई-रिक्षामुळे माथेरानमध्ये पर्यटन क्रांती घडत आहे. परंतु, या रिक्षाच्या मार्गात अनेक ठिकाणी दगडगोटे आणि खराब रस्त्यामुळे प्रवास करताना रिक्षाला खर्चिक बाब होत आहे. तर, काही भागात खाचखळग्यातून जाताना त्रासदायक बनत होते. येथील वखारी नाक्यापासून ते पांडे रोडच्या पुढील भागापर्यंत पावसाळी पाण्याच्या प्रचंड ओघाने खूपच रस्ता खराब झाला होता.

याकामी अनेकदा लोकांनी नगरपरिषदेच्या कार्यालयात तक्रारी दिल्या होत्या. याकामी प्रशासक तथा मुख्याधिकारी राहुल इंगळे यांनी संबंधित विभागाला सूचना देऊन या रस्त्याची दुरुस्ती करण्यास सांगितले. त्यानुसार या रस्त्याची कामे सद्यःस्थितीत युद्धपातळीवर सुरू आहेत. यामुळे पायी चालत जाणाऱ्या, त्याचप्रमाणे ई-रिक्षा चालकांना दिलासा मिळाला आहे. अशाप्रकारे ज्या ज्या ठिकाणी रस्त्यांची वाताहत झाली आहे, ते रस्तेसुद्धा जलदगतीने दुरुस्त करावेत, अशी मागणी स्थानिकांमधून होत आहे.



# चौलनाका अद्याप खड्ड्यातच

## सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

ऐन गणेशोत्सवात सार्वजनिक बांधकाम खात्याने चौलनाक्यावर केलेली मलमपट्टी थोड्याशाच पावसाने वाहून गेल्याने चौलनाक्यावरील रस्ता चिखलमय आणि खड्डेमय झाला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून असलेले चौल नाक्यावरील खड्ड्यांचे साम्राज्य अद्यापि जैसे थेच आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांसह वाहनचालकांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

अलिबाग व मुरूड तालुक्याला मध्यवर्तीठिकाणअसलेलेचौलमधील चौल नाका हा नित्याने वाहतुकीचा आहे. मात्र, गेली अनेक वर्षे ऐन पावसात हा नाका खड्ड्यातच असतो. येथील रस्त्याला पडलेल्या खड्ड्यांमुळे तलावाचे स्वरुप आले आहे. त्यामुळे वाहनचालकांना वाहने चालवताना तारेवरची कसरत करावी लागते. विशेष करुन सायलकस्वार आणि मोटारसायकलचालकांचे मोठे हाल होतात.

चौल नाक्यावरील रस्त्याच्या दुरवस्थेबाबत अनेकदा सार्वजनिक बांधकाम खात्यास निवेदने देण्यात आली आहेत. मात्र, सार्वजनिक बांधकाम खात्याचे पूर्णतः दुर्लक्ष होत आहे. यावर्षी मुरूड ते अलिबाग रस्ता नूतनीकरण, दुरूस्ती करण्यात आली. मात्र, चौल नाका दुर्लक्षितच ठेवण्यात आला. याबाबत सार्वजनिक बांधकाम खात्याचे कार्यकारी अभियंता यांच्याशी संपर्क साधला असता, या रस्त्यासाठी निधी उपलब्ध नसल्याचे सांगितले.

या रस्त्याच्या दुरूस्तीसाठी स्थानिक ग्रामस्थ व प्रवासीवर्गाने रास्ता रोकोसारखे आंदोलन छेडणे जरूरीचे आहे.

## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- घरात घरकाम व मुलाची देखभाल करण्यासाठी केअर टेकर पाहिजे आहे. ठिकाण नागाव. कामाची वेळ सकाळी ९ ते संध्याकाळी ६ , पगार १००००. संपर्क- ७८७५८६६५५५.
- कुकूचकू पोल्ट्री फार्म प्रा.लि. फीडमिल प्लान्ट EICHER करीता TRANS परवानाधारक वाहनचालक पाहिजेत पगार १३०००/-+ भत्ता २००/५००/९०० TRIP नुसार संपर्क : HR अनुष्का राऊत - ७७९८८८३८६४
- अलिबागमधील कार्यालयासाठी कर्मचारी आवश्यक आहेत. ताजे पदवीधर मुलाखतीसाठी येऊ शकतात. संपर्क : ९९२३७५०५४९, वेळ सकाळी ११ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत.
- वाडगाव येथे कॉटेज सांभाळण्याकरिता केअरटेकर पाहिजे. संपर्क-९७६२७७७९७५.
- नांदगाव-मुरूड येथील कॉटेज श्री समर्थ रिसॉर्ट भाडेतत्वावर चालविण्यास देणे आहे. संपर्क : ९७६९४७४०६३
- काशिद बीच येथील गेस्ट हाऊस भाडेतत्वावर चालविण्यास देणे आहे. संपर्क : ९५२७०६२४०८
- आमच्या अलिबाग येथील कार्यालयात एका कुशल टायपिस्टची गरज आहे. उमेदवाराने मराठी आणि इंग्रजी भाषेत उत्तम टायपिंग कौशल्य असावे. संगणकाचे प्राथमिक ज्ञान असणे आवश्यक आहे. इच्छुकांनी खालील पत्त्यावर अर्ज पाठवावा. पत्ता : अष्टगंधा सोसायटी, रायवाडी कॉम्प्लेक्स, चेंढरे, अलिबाग. संपर्क- ७७९८४०५३८३
- अगस्त्य फाऊंडेशन या नामांकित समाजसेवी संस्थेच्या अलिबाग शाखेत INSTRUCTOR या पदासाठी मुलाखती चालू आहेत. पात्रता- पदवीधर (BSC/MSC/BED/DED/BE) निवड प्रक्रिया- लेखी परीक्षा व मुलाखत. मो. रोहन म्हात्रे- ७९७२२१९३६२, ईश्वर पाईकराव- ८५५२८७७३७४

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# चित्रकार पराग बोरसेंना अमेरिकेचा पुरस्कार

**। माथेरान । वार्ताहर ।**

अमेरिकेच्या पेस्टल सोसायटीने भारतीय कलाकार पराग बोरसे यांना २०२४ सालचा बहुमोल समजला जाणारा फ्लोरा बी गुफिनी मेमोरियल पुरस्कार जाहीर केला आहे.नुकताच मॅनहॅटन, न्यूयॉर्कमध्ये एका आलिशान समारंभात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. माथेरान पर्यटनस्थळ हे आजोळ असलेल्या परागवर येथे शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे.



न्यूयॉर्कमध्ये भरलेल्या 'एंडूरिंग ब्रिलियंनस' या नावाने प्रसिद्ध असलेल्या त्यांच्या वार्षिक आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाचे हे ५२ वे वर्ष असून, यावर्षी अमेरिकेच्या पेस्टल सोसायटीला जगभरातून ११५५ सबमिशन प्राप्त झाली होती. त्यांनी समावेशासाठी केवळ १२५ कलाकृती निवडल्या होत्या. पराग बोरसे यांचे सॉफ्ट पेस्टल या माध्यमातून चितारलेले 'ए टर्बन गेझ' हे एका फेटा घातलेल्या धनगराचे व्यक्तिचित्रण आहे. पराग बोरसे यांच्या या चित्राची पुरस्काराकरिता निवड जेरेनिया विल्यम मॅककारथी (द वेस्ट मोरलँड म्युझियम ऑफ अमेरिकन आर्ट, ग्रीन्सबर्ग, पेन्सिल्वेनियाचे मुख्य आर्ट क्युरेटर) या पंचांनी केली आहे. रोख एक हजार अमेरिकन डॉलर्स आणि प्रशस्तीपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

पेस्टल सोसायटी ऑफ अमेरिका या संस्थेची फ्लोरा बी गुफिनी यांनी १९७२ मध्ये स्थापना केली. ही अमेरिकेतील सर्वात जुनी कला संस्था आहे.

पराग बोरसे हे एकमेव भारतीय कलाकार आहेत ज्यांच्या कलाकृतीची या संस्थेने आपल्या वार्षिक प्रदर्शनासाठी चार वेळा निवड केली आहे. पराग बोरसे यांना यापूर्वी दोन वेळा पेस्टल सोसायटी ऑफ वेस्ट कोस्ट अमेरिका यांनी पुरस्कार देऊन गौरविले आहे. तसेच अमेरिकेतून प्रकाशित होणाऱ्या पेस्टल जरनल या मॅक्झिननेसुद्धा त्यांना दोन वेळा पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे.

कर्जत शहरातील युवक आणि माथेरान हे पर्यटनस्थळ आजोळ असलेल्या परागला आंतरराष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार मिळाल्याबद्दल तालुक्याबरोबरच माथेरानमधूनदेखील आनंद व्यक्त करून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

( पान १ वरुन)

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला राष्ट्रीय बहुमान

रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी किसन जावळे यांचे बहुमूल्य मार्गदर्शन मिळाले आहे. जिल्हा सहकारी उपनिबंधक, नाबार्ड जिल्हा व्यवस्थापक, लेखा परीक्षण विभाग, जिल्ह्यातील सर्व सहाय्यक निबंधक यांच्या एकत्रित प्रयत्नामुळेच देशपातळीवर बँकेचा हा गौरव केला जाणार आहे. हा संपूर्ण राज्याचा आणि जिल्ह्याचा बहुमान असणार आहे. बँकेने केलेल्या सर्वोत्तम कामासाठी केलेली ही निवड आहे. याअगोदरदेखील बँकेने २०१३ साली किसान डेबिट कार्ड आणि मोबाईल एटीएम व्हॅन हे उपक्रम देशपातळीवर पहिल्यांदा पूर्ण करणारी बँक म्हणून देशपातळीवर आपली ओळख निर्माण केली होती. संस्था संगणकीकरणामुळे बँकेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला जाणार आहे, असे वर्तक यांनी सांगितले.

## पाच कोटींचा पगार थकला

मुले शिक्षण घेत होते. हळूहळू या शाळांमध्ये आरसीएफसह शहरी व ग्रामीण भागातील मुलेदेखील शिक्षण घेण्यास येऊ लागली. शाळेतील शिक्षणाचा दर्जा चांगला असल्याने या शाळेला पालकांसह विद्यार्थ्यांकडून पसंती दर्शविण्यात आली. आरसीएफच्या शाळेत सीनिअर केजीपासून १२ वीपर्यंत शिक्षण मिळत आहेत. या शाळेत सीनिअर केजीपासून चौथीपर्यंत ३२१ विद्यार्थी व पाचवीपासून बारावीपर्यंतचे ५९६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शाळेमध्ये प्राथमिक विभागाचे शिक्षकांसह १३ कर्मचारी आहेत. त्यात तीन कंत्राटी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आहेत. तसेच माध्यमिक विभागाच्या शिक्षकांसह ३६ कर्मचाऱ्यांचा समावेश असून, कंत्राटी १२ शिक्षक आहेत. यातील प्राथमिक व माध्यमिक विभागातील नियमित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी असे एकूण ४४ जणांना जून ते सप्टेंबर या चार महिन्यांच्या कालावधीत वेतन मिळाले नसल्याची माहिती समोर येत आहे. आरसीएफ व्यवस्थापनाकडून वेतन मिळण्यास दिरंगाई होत असल्याचा आरोप शिक्षकांकडून होत आहे. गेल्या चार महिन्यांपासून वेतन मिळाले नसल्याने शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांवर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. महिन्यातील घरखर्च कसा करायचा, असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला आहे. सुमारे पाच कोटी रुपयांचे वेतन येणे शिल्लक असल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे.

## समायोजनास पालकांचा विरोध

आक्रमक भूमिका घेत शिक्षण विभागाच्या ही बाब लक्षात आणून दिली. शाळा चालू ठेवा, अशी मागणी केली. त्यानंतर शाळेच्या मध्यस्थीने शाळा सुरु ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. परंतु, शासनाने आरसीएफ शाळा सुरु ठेवण्यासाठी पर्यायी शिक्षण संस्था आहे का, असा सवाल उपस्थित करीत जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडे अहवाल मागविला. त्यानुसार शिक्षण विभागाने वरिष्ठांच्या सूचनेनुसार अहवाल पाठविला. ही बाब पालकांच्या लक्षात आली. डेक्कन शिक्षण संस्थेमार्फत चालविली जाणारी आरसीएफची शाळा बंद होण्याच्या हालचाली सुरु झाल्याने गुरुवारी सकाळी पालकांनी आरसीएफ शाळेत जमाव केला. आरसीएफ कंपनीचे अधिकारी व शिक्षण विभागाचे अधिकारी यांच्यासमवेत बैठक घेऊन हा अहवाल पाठविला कसा, असा सवाल उपस्थित केला. पालकांनी केलेल्या प्रश्नांच्या भडिमारापुढे शिक्षण अधिकाऱ्यांची पंचाईत झाली. दहावी, बारावीमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची जाणीव पालकांनी करून दिली. अखेर शिक्षण अधिकऱ्यांना धारेवर धरत घेतलेला निर्णय मागे घ्या, असे पालकांनी सांगितले. पालकांच्या आक्रमक भूमिकेपुढे शिक्षण अधिकाऱ्यांना अखेर माघार घेण्याची वेळ आली.

**शाळा सुरु राहावी ही आरसीएफ प्रशासनाची भूमिका आहे. किमान दोन वर्षे तरी शाळा डेक्कन संस्थेने चालवावी यासाठी आरसीएफ प्रशासन न्यायालयात गेले आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, ही आरसीएफ प्रशासनाची भूमिका आहे.**

**- संतोष वझे, आरसीएफ कंपनी जनसंपर्क कार्यालय**

**आरसीएफ शाळेचा दर्जा चांगला असून, विद्यार्थ्यांची सुरक्षादेखील चांगली आहे. दर्जेदार शिक्षण मिळतानादेखील शाळा बंद का केली जात आहे. डेक्कन शिक्षण संस्थेमार्फत शाळा चालू राहावी, ही भूमिका आहे.**

**- पालक**

## पालीमध्ये घरात शिरले पाणी

रहिवासी राजेश रुईकर, अविनाश शिंदे, गणेश शिंदे व संजय सागळे आदींच्या घरात व ओटीवर पाणी आले होते. त्यामुळे या लोकांची मोठी गैरसोय झाली. अतिशय कमी वेळात कोसळलेल्या मुसळधार पावसामुळे एकाच वेळी मोठ्या प्रमाणात पाणी वाहू लागले आणि या पाण्याचा वेगदेखील प्रचंड होता. यामुळे येथील रस्त्यावरून पादचारी व वाहनांना जाण्या-येण्यास अडचणी येत होत्या.

## हक्कासाठी उमेदच्या महिला एकवटल्या

स्थापन करण्यापासून महिलांना व्यवसायात उभे करण्यापर्यंत गावोगावी काम करत आहे. महिलांच्या विविध स्तरावर संस्था स्थापन करून त्या संस्था बळकट करताना महिलांची आर्थिक उन्नती साधून दारिद्रय निर्मूलनाचे काम मोठ्या प्रमाणत करीत आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये ७५ कर्मचारी व एक हजार केडर यांच्या अंतर्गत हजारो महिला काम करीत आहे. ग्रामीण भागातील ९० टक्के महिलांचा सहभाग अभियानामध्ये आहे. अभियानाच्या माध्यमातून येणाऱ्या काळामध्ये विकसित भारत करण्याची संकल्पना सत्यात उतरवण्यासाठी उमेद अभियान हा स्वतंत्र कायमस्वरूपी विभाग होणे आवश्यक आहे.

उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाला स्वतंत्र कायमस्वरूपी विभाग म्हणून आस्थापनेला मान्यता देऊन सर्व कार्यरत कर्मचारी व अधिकारी यांना शासनाच्या समकक्ष पदावर कायमस्वरूपी सेवेत समाविष्ट करून घेण्याची मागणी उमेद महाराष्ट्र राज्य महिला व कर्मचारी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर गुरुवारी (दि.२६) हजारो महिलांनी एकत्र येऊन आंदोलन केले. यावेळी असंख्य महिलांनी सरकारविरोधात घोषणा देण्यात आल्या.

**मागण्या पूर्ण होईपर्यंत लढा देणार**

प्रमुख मागणीच्या अनुषंगाने संघटनेच्यावतीने गाव स्तरापासून ते राज्यस्तरापर्यंत टप्प्या-टप्प्याने कृती कार्यक्रमाची आखणी करण्यात आली आहे. शासनाचे लक्ष वेधून मागण्या मान्य करण्यासंदर्भात लोकशाही पद्धतीने गाव, प्रभाग, तालुका, जिल्हा व राज्य स्तरावर आंदोलने, प्रभात फेरी, मागणीबाबत जनजागृती मेळावे, उमेद मागणी जागर, दिंडी व महाअधिवेशन भरविण्यात येणार असल्याचे राज्यस्तरीय समितीच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे.

## विक्रेत्याने मुलींची छेड काढली

असल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात आले. तसेच हा परप्रांतीय विक्रेता व त्याचे परप्रांतीय साथीदार या अनधिकृत टपरीमध्ये बसून दारु पिऊन शेजारीच असलेल्या बस स्टॉपमध्ये बसची वाट पाहात असलेल्या शालेय मुलींची छेडछाड काढत असतो. त्यामुळे स्थानिक नागरिकांनी व श्रीराम पुलावर असलेल्या रिक्षाचालकांनी त्यांना अनेकदा समज दिली होती. तरीदेखील परप्रांतीय विक्रेता दारुच्या नशेत शालेय मुलींची छेड काढत होता. म्हणून स्थानिकांनी त्याला चोप दिला.

त्या अनधिकृत टपरीबद्दल प्रभाकर गंगावणे यांनी कर्जत नगरपरिषदेचे मुख्याधिकारी विभा गारवे यांच्याशी संपर्क साधून माहिती दिली. त्यानंतर मुख्याधिकारी गारवे यांनीदेखील तातडीने कारवाई करण्याचे आश्वासन दिले आणि नगरपरिषदेचे अतिक्रमण विरोधी पथकाचे बाळा निकाळजे यांना सदर ठिकाणी असलेली अनधिकृत टपरी हटविण्यास पोहोचले. पालिका कर्मचारी हे अनधिकृत टपरी हटविण्यासाठी तातडीने घटनास्थळी गेले होते; परंतु, सदर टपरीधारक टपरी बंद करून पसार झाला. टपरीधारक टपरी बंद करून गेला आहे. त्यामुळे पालिका आता ती बेकायदेशीर टपरी एक-दोन दिवसात तिथून हटवणार असल्याचे आश्वासन नकाळजे यांनी दिले आहे.

## राजकीय बनाव, महायुतीत तणाव

देखील या मतदारसंघातून निवडणूक लढविण्यास इच्छुक आहेत. त्यांनी मतदारसंघात संपर्क वाढवला आहे. मात्र, थोरवे यांच्यासमोर मोठे आव्हान घारे यांनी उभे केले आहे. थोरवे यांनी महायुतीचा घटक पक्ष असलेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष युतीधर्म पाळत नाही, अशी टीका करत सुनील तटकरे यांच्यावरदेखील लक्ष्य केले होते. त्यावर सुनील तटकरे यांनी त्यांच्या टीकेची दखल न घेता या जागेवर राष्ट्रवादी काँग्रेसचा दावा सांगत सुधाकर घारे यांना पाठबळ दिले. सुधाकर घारे गेल्या दीड-दोन वर्षांपासून मतदारसंघात लोकसंपर्क वाढवत आहेत. काही महिन्यांपूर्वी त्यांनी गावभेट दौरा केला. त्यामुळे थोरवे यांची डोकेदुखी वाढली आहे.

दरम्यान, विधानसभा जागावाटपाच्या वेळी कर्जत खालापूरच्या जागेवरुन महायुतीत खटके उडण्याची शक्यता आहे. एकनाथ शिंदे यांच्या पक्षाकडून सहजरित्या ही जागा सोडली जाण्याची शक्यता कमी आहे. तर, राष्ट्रवादीचा या जागेवरील दावा मागे घेतला जाऊ शकत नाही, या जागेवर राष्ट्रवादी अडून राहण्याची शक्यता अधिक आहे. त्यातच भाजपलादेखील ही जागा आपण लढवावी, असे वाटत आहे. त्यामुळे या जागेवरुन महायुतीत तणाव वाढण्याची शक्यता आहे. त्यातच लोकसभा निवडणुकीतदेखील थोरवेंना बारणे यांना मताधिक्य देता आले नसल्याचा दावा करत घारेंनी आमदार थोरवेंच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण केले.

## मतदारांना प्रलोभने दाखविणाऱ्यांनो सावधान

समीर शेख यांसह राज्य उत्पादन शुल्क विभागाचे सर्व प्रमुख अधिकारी उपस्थित होते. निवडणूक कालावधीत आदर्श आचारसंहितेची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. यासाठी कायमस्वरुपी चेकपोस्टसोबतच सीमेवर तात्पुरत्या चेकपोस्टची स्थापना करणे आवश्यक आहे. सर्व जिल्ह्यांनी या कामासाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करुन द्यावे, असे यावेळी निश्चित करण्यात आले. निवडणुकीवर परिणाम होऊ शकणाऱ्या चलन, मद्य आणि इतर वस्तूंची अवैध वाहतूक रोखण्यासाठी विशेष दक्षता घेण्यासाठी प्रभावी उपाययोजन करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. निवडणुकीवर प्रभाव टाकण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या कोणत्याही मालाची वाहतूक करण्यासाठी सामान्यतः वापरल्या जाणाऱ्या ट्रकच्या हालचालींवर लक्ष ठेवून त्यावर कारवाई करण्याचा निर्णय उपस्थित अधिकाऱ्यांनी घेतला.

निवडणूक आदर्श आचारसंहितेचे कोणतेही उल्लंघन होणार नाही याची खात्री करण्यासाठी शेजारच्या राज्यातील व शेजारील जिल्ह्यांच्या अधिकाऱ्यांनी संपूर्ण समन्वयासाठी सहमती दर्शवली. ग्रामीण भागात तसेच सागरी मार्गाने होणाया वाहतुकीची प्रत्येक टप्प्यावर कसून तपासणी करण्याचा निर्णयही बैठकीत घेण्यात आला. सर्व सीमा भागात प्रमुख रस्त्यांसह आतील लहान मार्गावर बारकाईने लक्ष ठेवण्याची आवश्यकता असल्याचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी नमूद केले. सहभागी सर्व जिल्हाधिकारी यांनी लोकसभा निवडणूक आचारसंहिता काळात केलेल्या उपाययोजना आणि विधानसभा निवडणूकीच्या अनुषंगाने केलेल्या पूर्वतयारीची माहिती सादर केली.

यावेळी सीमाभागातील सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी, पोलीस आणि जिल्हा प्रशासनातील संबंधित अधिकारी उपस्थित होते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)